या रौद्रध्यानाच्या प्रभावाने आपण अनेकवेळा नरकात उत्पन्न झालो आहोत, अनेक वेळा पशुयोवनीत जन्म घेऊन घोर दु:ख सहन केले आहे, अनेक कुमानुष योनीत जन्मून भयंकर दारिद्र व अनिवार्य रोगाचे दु:ख भोगले आहे. म्हणून आता तरी हे उत्पन्न न होईल अशी काळजी घेणे आपले कर्तव्य आहे. या रौद्रध्यानात कृष्णलेश्येचे बल असून हे पाचवा गुणस्थानापर्यंत उत्पन्न होते. तथापि अव्रती सम्यग्दृष्टीला व पंचमगुणस्थानावर्ती व्रती श्रावकाला नरकगती प्राप्त करून देण्याइतके ते तीव्र असत नाहीत. कधी कधी असे घडून येते की, सदरील व्रती गृहस्थला आपल्या मुलामुलींची लग्ने करण्याचा, राहते घर बांधविण्याचा,न्यायमार्गाने उपजीविका करीत असता अधिक लाभ होणाऱ्या कार्याचे चिंतन करण्याचा प्रसंग प्राप्त होतो व त्यात हिंसाही घडते. परंतु ही हिंसा देखील पापाचे कारण आहे, तिच्यापासून आपले कल्याण आहे अशी त्याला जाणीव असते व त्यामुळे तो सदैव आत्मनिंदा करित असतो, तरी देखील त्याला आपण आरंभिलेल्या कार्यापासून किंचित हर्ष होतच असतो. न्यायमार्गाने योग्य परिग्रह ठेवला असूनही त्या मर्यादेच्या आत काही ्प्राप्तीझाली असता आनंद होतो. तसेच आपले धन चौरादिकांच्या हाती लागू नये म्हणून यत्याचे रक्षण करण्ात काही खोटे प्रयोग व मयाचार त्याला योजावे लागतात. तरीत्याची अन्यजीवांचे प्राण वगैरे हरण करू न घेण्याकडे प्रवृत्ती नसते. आपल्या धनाचे संरक्षण करू न घेण्याकरिता तो कपटाची आडवीढ ाल धरतो. दुसऱ्याचा घात करण्याकरिता तो कपट व असत्य यांची तरवार योजित नाही. म्हणून त्या श्रावकाला नरकादि कुगतीचे कारण असे रौद्रध्यान होत नाही.

रोद्रध्यानी मनुष्याची बाह्य लक्षण अशी असतात- तो स्वभावत: क्रूर असतो. त्ाला दुसऱ्याला तीव्र दंड देणे, दुसऱ्याविषयी निर्दयपणा व कपटवृत्ती दाखविणे, दुसऱ्याचे असतील तितके दोषच ग्रहण करणे वगैरे विकार नेहमी मनात घोळत असतात.याशिवया रागाने डोळे लाल होणे, भुवया चढविणे, भयंकर आकृती धारण करणे, तोंडाने दुष्ट वचन कउच्चारणे वगैरे अनेक बाह्य चिन्हे त्याच्या अंत:करणातील होणाऱ्याल विकाराला प्रगट करणारी आहेत. रौद्रध्यान क्षायोपशमभाव आहे. अंतर्मुहूर्त (पंचेचाळीस मिनिटे ) कालानंतर पुन: वेगवेगळे विचार मनात येत असतात. याप्रमआणे चार प्रकारेच रौद्रध्यानाचे स्वरू प आहे. याचा त्याग केला तर धर्मध्यान होऊ शकते, आजपावेतो रौद्रध्यानाचा त्याग केला नाही म्हणून धर्मध्यानाची वापरण आपणाला अनादिकालापूसुन झाला नाही. आता धर्मप्राप्त्यर्थ दोन्ही दुर्ध्यानाचे स्वरू प समजून घङेऊन आपल्या आत्म्यात आर्तरौद्रध्यानाचे विकार उत्पन्न होऊ न देणे यातच कल्याण आहे.

## धर्मध्यान

यापुढे धर्मध्यानाच्या स्वरू पाचा विचार करू . धर्मध्यान हेक्चित एखाद्या सम्यग्दृष्टी पुरुषाला होते. एखाद्या विरळा महानम पुरुष राग द्वेष, मोहरुपी फाशी नाहीशी करू न अतिशय दृढ उदोयगाने व सतत परिश्रमाने धर्मध्यानाकडे प्रवृत्त होतो. जसे बसता, उठता, चालता, खातापिता, विषयोपभोग घेत सता, विषयाकडे प्रवृत्त झालेल्या माणसाला काहीही प्रयत्न न करता आर्तरौद्रध्यान होते, तद्वत धर्मध्यान होत नाहही. धर्मध्यान स्थिरतेने व्हावे म्हणून परिणामाला बिघडिवणआर्या अनेक स्थांचा त्याग करावा लागतो. कारण स्थलमहात्म्याने विचारात शुभाशुभता प्राप्त होत असेत.

याकरिता अशा वाईट स्थानांचा अवश्य त्याग केला पाहिजे. खोट्या  जागी जाऊन बसलो तर खोटेच विचार स्थानांचा अवश्य त्याग केला पाहिजे . खोट्या जागी जाऊन बसलो तर खोटेच विचार मनात येणार. ज्या ठिकाणी दुष्ट, हिंसा करणारे, पापकर्म करणारे, पापकर्मावर आपली उपजीविका करणारे, तीर्व कषायी, नास्तिक, धर्मद्रोही वगैरे असतील तेथे आपण जर सतत जाऊ लागलो तर स्वतः आपलेही विचार त्याप्रमाणे होतात. जेथे राजा दुष्ट असले, राजाचे मंत्री दुष्ट असतील, राज्यकारभार पाखंडी, मिथ्यादृष्टीव भेषधाऱ्यांच्या हातात असते तेथे धर्मध्यानात विचार स्थिर राहात नाहीत. जेथे प्रजेवर परचक्र आले असेल, दुर्भिक्ष पडले असेल रोगाची साथ चालू असेल व या सर्वामुळे जेथे प्रजेला उपद्रव होत असेल तेथे धर्मध्यान होऊ शकतनाही. जेथे नेहमी वेश्या येत, जात असतील व्यभिचारिणी स्त्री-पुरुषांचे जे संकेतस्थान असल, आचारभ्रष्ट भेषधारी साधू जेथे राहत असतील, जेथे सतत रसरसायनक्रिया चालत असतील, मारण, जारण, उच्चाटण, आदि विद्या साधन होत असेल, हिंसादिक पापकर्माचा उपदेश चाललेला असेल, कामशास्त्र, युध्दशास्त्र कपटी व धूर्त लोकांनी रचिलेल्या गोष्टी यांचे जेथे प्ररू पणहोत असेल, जेथे द्यूत क्रिडा करणारे, मद्यपानी, व्यभिचारी, भाट, हिजडे वगैरे नीच व चांडाल, धीवर, शिकारी व कसायी वगैरे दुष्ट लोक असतील, दुष्टतपस्विनी व सामान्य स्त्रिया जेथे नेहमी येत असतील, जेथे नपुंसकांचा संचार असेल,  दीन, याचक, रोगी विकलांगी, आंधळे, लंगडे, बहिरे, दीन सदैव येत असतील, जेथे शिकार करणारे हिंस्त्र पशूव कलहप्रिय मनुष्य व पशू असतील, जेथे अनेक किड्यंची बिळे, काटे,गवत, खूर दगड, हाड, मांस रू धिर, मल मूरत्र, पंचेद्रिय जीवांचे मृत शरीर, चिखल वगैरे असून त्यायोगे दुर्गंध येत असेल, कुत्रे, घुबड, मांजर, कोल्हे कावळे वगैरे प्रापणी राहत असतील व याचप्रमाणे शुभ परिणामाला बिघडविणारे अने पदार्थ जेथे दिसून येतील ती सर्व स्थाने अवश्य सोडली पाहिजेत. अशा स्थानापासून परिणाम अवश्य बिघडतात. शुभ ध्यान व्हावे अशी इच्छा असेल तर वरील सर्व स्थानी जाऊन धर्मध्यान करण्याचा विचार स्वप्नात देखील आणू नये.

धर्मध्यानाला योग्य असे सुंदर, मनाला रमविणारे, शीत, उष्ण,पाऊस यांची व ऊन, वारा वगैरेची जेथे मुळीच बाधा होणार नाही असे, डांस, मच्छर, अन्य विकलत्रय जीव ही जेथे पीडा करणार नाहीत असे शुध्द स्थान, एखादी निर्मळ जागा, अथवा उत्तम दगड, अथवा लाकडाची फळी यातून काही असेल तर त्यावर बसून, शून्यगृहात किंवा बागेतील किंवा वनातील मंदिरात, किंवाआपल्या घरात पण निराकुल अशाएकांत जागी, जेथे कोणतीही बाधा उत्पनानहोणार नाही, रागद्वेष उत्पन् करणारीसाधने उपलब्ध होणार नाहीत, गोंगाट किंवा नृत्यवादित्राचा शब्द ऐकू येणार नाही, जेथे कलह, विसंवाद, हिंसा वगैरे कृत्ये घडलेली दृष्टीस येणार नाहीत, अशा जागी धर्मश्तान  करू इउच्छिणार्या पुरुषांनी जाऊन निश्चल वृत्तीने बसावे. धर्मध्यानाला स्थानशुध्दि व आसनाची दृढता यादोनमुख्य गोष्टीकारण ाहेत. ज्याला दोनप्रहर (सहा तास) देखील एके जागी स्थिर बसणे होत नाही त्याला धर्मध्यानतरराहोच पण व्यवहार, कृषि, सेवा ही देखील यथार्थ होत नाहीत. मग धर्मध्यान कसे होर( धर्मध्यानाचे तर बिलकुल हालचाल नकरता एके जागी बसणे हेच मुख्य साधन आहे. पहिली जी तीन उत्तम संहनेने आहेत ती धारण करणाऱ्यांनाच ध्यानची दृढता होते. ज्यांचे वज्रसारखे संहनन आहे व जेमहापराक्रमी व बलवान्असूनदेवमनुष्यादिकांच्याघोर उपद्रव्याासून यत्किंचितही चलायमानहोत नाहीत वज्यांचे आसन वमन खंबीर असते ते लोककशाही स्थानी कसल्याही आसनाने ध्यान करू शकतात.पण ज्यांना तसेसंहनन नाही त्यांनी स्थानाची शुध्दता व आसनाची दृढता ही अवश्य पाहून ध्यान करण्याकडे प्रवृत्त झाले पाहिजे. ज्यांचे मन संसार-देह-भोगादिकांपासून विरक्त झाले आहे, ज्यांच्या अंतःकरणात कोणत्याही

कारणांनी क्षोप होत नाही, ज्यांना स्थान व आसनांचा नियम नाही, ते ज्ञान चारित्रसंपन्न होऊन जिंतद्रियत्वमुळे अनेक प्रकारांनी ध्यान सिध करू शकतात.

(( मी अनंतगुणोला धारणकरणारा असून संसाररू पी वनात अनादिकालापासून कर्मरू पी वैऱ्याकडून सर्व प्रकारे फसविला गेलो आहे. मी अज्ञानाने उत्न्न होणाऱ्या रागद्वेषमोहादिकांना आपले स्वरू प मानून संसारात परिभ्ररमण करीत आलो. यावेळी कर्माचा काहीसा उपशम झालायमुळे परमोपकारक जिनपरमागमाच्या उपदेशाचा लाभ झाल्यामुळे माझा रागद्वेषरू पी ज्वरनाहीसा झाला आहे. आता मोहरू पी निद्रा नाहीशी झाल्याने स्वस्भाव व परस्वभावाचा जाणपणा प्राप्त झाला आहे. यावेळी शुध्दध्यान हीच कोणी एक तरवार, हिने जर कर्मरू पी शत्रूचा नाश करीन तर स्वस्वरू पाची प्राप्त होऊन दु:ख मुक्त होईन. आत्माज्ञानरू पी सूर्याच्या प्रकाशाने अज्ञानरू प अंध:काराला यावेळी नाहासा केला नाही तर मग दुसऱ्या कोणत्या अवस्थेत अशी वेळ मला प्राप्त होईल( संपूर्ण जगाला पाहणारा असा अद्वितीय नेत्र माझा आत्माच आहे.तयाला अविद्यारू पी पिशाचांनी प्ररेणा केलेले विषयकषाय आपल्याकडे ओढण्याचा प्रयत्न करीत असतात. इंद्रियांचे विषय आणि कषाय माझे हिताहित पाहू देत नाहीत. या ठकांच्या स्वाधीन होऊनआपले खरे स्वरू प विसरू न गेली आहे. इंद्रियविषय रमणीय भासतात. पण शेवटी ते नीरस बनून आत्म्याचा घात करतात. यांच्या नादी लागल्याने माझापरम प्रकाशमान आत्मा स्वस्वरू पपापासून ठकिवला जात आहे. मी व परमात्मा दोघे आनलोचन आहोत.परमात्मस्वरू पाची प्राप्ती व्हावी म्हणून मी स्वस्वरू प प्राप्त करू न घेम्याची इच्छा करीतआहे. परमात्म्यामध्ये तर आत्मगुण प्रगट झालेला आहेच. पण माझा आत्मा कर्माच्या औझ्याखाली दबून गेलाआहे. मी आणि परमात्मा यात गुणांच्या योगाने भेद नाही. आमच्यात फक्त एकाची शक्ती व्यक्त झाली आहे व दुसऱ्याच व्यक्त झालेली नाही, एवढाच शक्तिव्यक्तृत्वाचा भेतद आहे. कर्मकृत संताप व दु:ख जोपर्यंत मी ज्ञानसमुद्रात बुडी मारली नाही तोपर्यंत मलात्रास दोत राहतील. नरक, पशु, देव, मनुष्य हेकर्मोदयाने प्रपात होणारे पर्याय वस्तूत: माझे स्वरू प नव्हेत. मी सिध्दस्वरू प, निर्विकार, व अनंतज्ञान, अनंतदर्शन, अनंतवीर्य. अनंतसुखरू प आहे, म्हणून मीआता इंद्रियरू पी विषवृक्षाला उपटून टाकतो व आपले खरे सामर्थ्य ओळखून आपल्या स्वरू पात लीन होतो. सर्व इच्छा नाहीशा करू न मोहरू पी विषवृक्षा उपटून टाकतो व माझ्या स्वरू पात निश्चल राहतो. अनादिकाापासून मोहरू पी पाशाना माझा कंठ दबून गेलेला आहे. तो आता मला मोकळा करवयाचा आहे. जे आपल्या स्वरू पाला जाण नाहीत ते परमात्मायला तरी कसे जाणतील( महणून ज्ञानवान पुरुषाला सर्वात अगोदर आपल्या स्वरू पाचा निश्चय करणे योग्य आहे. जो स्वस्वरुपालाच जाणणार नाही त्याची त्यात स्थिरता तरी कशी होईल( दुसरे, हा आत्मा अनादिकालापासून पुद्गलाशी एकरू प होऊन राहिला आहे. तो वास्तविकक तसा नसून स्वतंत्र होण्यासरखा आहे, हे भेदिवज्ञान तरी मला कधी प्रपात होणर( ते झाल्याशिवाय आत्लाभ तरी कसा होणार( आत्मलाभाशिवया अनंतज्ञानादि आत्म्याचे जे गुण आहेत त्यांचा जाणपणातरी कोठून होणार( या इतक्या गोष्टी जर समजल्या नाहीततर आत्मलाभाची गोष्ट कशाला( याकरिता मोक्षाभिलषी पुरुषाला पुद्गलाचे सर्व पर्याय ह्य आत्म्यापासून भिन्न मानूनआत्मा स्वतंत्र निराळा आहे असे मानले पाहिजे.((

आत्म्याचे तीन प्रकार आहेत. बहिरात्मा, अंतरात्मा व परमात्मा. ज्याला बाह्य शरीरादिक पुद्गलपर्यायामध्ये आत्मबुध्दी असते त्याला बहिरात्मा म्हणतात. ज्याचे मोहरू पीनिद्रेमुळे चैतन्य अस्त झाले आहे व त्यामुळे तो पर्यायालाच आपले स्वरू प मानतो, ज्याची प्रवृत्ती नेहमी इंद्रियाला अनुसरू न घडते, ज्याला आपले स्वरू प सत्यपणे

समजत नाही, जो शरीरालाच आत्मा समजतो, देवपर्यायात उत्पन्न झाला असता देव, नरकगतीत उत्पन्न झाला असता नारकी, तिर्यंच गीतत उत्पन्ना झाला असता स्वत:ला तिर्यंच आणि मनुष्यगतीत मनुष्य असे मानतो आणि या पर्यायाच्या व्यवहाातच सदैव मग्न असतो. हे पर्याय कर्मापासून उत्पन्न झाले असून तेप्रत्यक्ष ा ज्ञानरू प आत्म्यापासून वेगळेदिसत असूनही, कर्मजनित उदय हेच आपले स्वरू प आहे अशा समजुतीने पर्यायात तन्मय होईन राहतो. मीगोरा, मी काळा, मी सावळा, मी अन्यवर्णाचा, मी राजा, मी रंक, मी स्वामी, मी सेवक, मी बलवान, मी निर्बल, मी ब्राह्मण, मी क्ष ात्रिय, मी वैश्य, मी शूद्र, मी मारणारा, मी जीवनदान देणारा, मीधनाढ्य, मी दातार, मी त्यागी, मी गृहस्थ, मी मुनी, मी तपस्वी, मी दीन, मी अनाथ, मी समर्थ, मी कर्ता, अकर्ता, मी सुरुप, मी कुरुप, मी पुरुष मी, मी स्त्री, मी नपुंसक, मी पंडित, मी मूर्ख इत्यादि कर्माच्या उदयाने प्राप्त होणारी परपुद्गलाची विनाशिक अवस्था मी माझी आहे असे ्जायला वाटते तो बहिरात्मा मिथ्यादृष्टील जाणावा. शरारावषयीअशी आत्मबुध्दी झाल्याने शराराशी संबंध ठेवणार्या स्त्रीपुत्र, मित्रशत्रु, इत्यादिकांमध्ये रागद्वेष-मोह क्लेशादि उत्पन्न होतात व त्यामुळे आर्तरौद्र परिणामात मरण प्राप्त होऊन संसारात अनंतकाल जन्म-मरण करावे लागते. ही पुद्गलाच्या पर्यायातील आत्मबुध्दी पुद्गलात व एकेंद्रियात अनंतकाल भ्रमण करविते म्हणून ही बहिरात्मबुध्दी टाकून अंतरात्म्याचे अवंबल करावे व परमात्मपद प्राप्त होईल असा पयत्न करावा.

या जगात जे जे रू प पाहण्यात येते ते सर्व आत्मस्वभावाहून वेगळे आहे. ते परद्रव्य असून जड व अचेतन आहे. मी ज्ञानस्वरू प असून इंद्रियांकडून जाणला जात नाही. माझे स्वरू प स्वानुभवारू न साक्ष ाात जाणू शकतो. इतराकडून मी समजविण्यास योग्य आहे अथवा मी इतरांना समजावून देणारा आहे असा विकल्प मनात आणणे हेच मुळी भ्रमात्मक आहे. स्वत: जाणल्याशिवाय कोणी कोणाला व कसे समजावयाचे( मी तर संपूर्ण विकल्परहित ज्ञाता आहे. आपल्या स्वरू पाला जो आपणच ग्रहण करतो व आपणाहून इतरांना आपल्या स्वरू पाचे जे जाणत नाही, ते स्वयंवेदनरू प ज्ञान आत्म्यालाच होत असते. जसे अंधारात दोरीला पाहून तो सर्प आहे असे ज्ञान झाले असता त्यापासून भय उत्पन्न होते व मरणाच्या भीतीने त्यापासून दूर पळावे लागते. ही क्रिया घडते ती वास्तविक भ्रमात्मक आहे. याचप्रमाणे आम्हालाही पूर्वकाली शरीरादिकाविषयी आत्मबुद्धी होती. शरीराचा नाश तो आपल्या नाश असे आम्ही समजत होतो व त्यायोगे पुष्कळशा विपरीत क्रिया करीत होतो. आता ज्याप्रमाणे दोरीविषयी सर्पाचा भ्रम नष्ट झाला व दोरीला दोरीच जाणले व त्यामुळे भ्रम नाहीसा झाला. तद्वत शरीरावरील आत्मत्वाचा भ्रम नष्ट झाल्यामुळे आता आचरणातील भ्रमही नाहीसा झाला आहे. ज्याचे ज्ञान आजपावेतो नसल्यामुले इतके दिवस झोप घेत होतो व ज्याचे ज्ञ ाान झाल्यामुले मी आता जागृत झालो आहे, तो चैतन्यमयी मी आहे. या ज्ञानज्योतिरू पी आपल्या स्वरू पाला पाहणाऱ्या माझे रागद्वेष नष्ट झाले आहे, तो चैतन्यमयी मी आहे. या ज्ञानज्योतिरू पी आपल्या स्वरू पाला पाहणाऱ्या माझे रागद्वेष नष्ट झाले आहेत. आता मला कोणी शत्रू अथवा मित्र उरला नाही. ज्ञानामध्ये रागद्वेषाचा विकार उत्पन्न झाला म्हणजे शत्रू मित्र दिसू लागतात. ज्याने माझ्या ज्ञायक आत्मस्वरू पाला जाणले ाही, तो किंवा ज्याने माझ्या स्वरू पाला साक्ष ाात पाहिले तो, यापैकी कोणीही माझा वैरी किंवा मित्र नाही. स्वस्वरू पाचे ज्ञान झालेल्या मला आता पूर्वीचे सर्व आचरण स्वप्नाप्रमाणे अथवा इंद्रजालाप्रमाणे खोटे भासत आहे. ज्ञानी पुरुषाचे अलौकिक चारित्र वर्णन करण्याला कोण समर्थ आहे( जेथे अज्ञानी जीव आपल्या प्रवृत्तीमुळे कर्माचा बंध करू न घेतो, तेथे ज्ञानी आपल्या प्रवृत्तीने कर्मबंधापासून मुक्त होत असतो. जगात पदार्थ जसे आहेत तसेच अनादिकालापासून व पुढेही राहणार आहेत, त्यात फेरबदल होत नाही. पण अज्ञानी जीव त्याविषयी विपरीत भावना करू न रागद्वेषमोह इत्यादि विकार उत्पनन करू न घेतो, त्यमुळे त्याला कर्माचा बंध होतो. ज्ञानी पुरुष पदार्थाचे सत्य स्वरू प जाणतो व परमसाम्यभाव धारण करू न रागद्वेषरहित प्रवृत्ती

करतो, म्हणून त्याला कर्मबंध होत नाही, उलट कर्माची निर्जरा होत जाते. मी जो चिरकालापासून संसाररू पी वनात दु:ख भोगून राहिलो आहे. याचे मुख्य कारण फक्त स्वपरविज्ञानाचा भेद जाणला नाही हेच आहे. सर्व पदार्थाला प्रकाशित करणारा भेदविज्ञानरू प दीपक प्रज्वलित झाला असताना मूढ लोक संसाररू पी चिखलात फसले आहेत हे आश्चर्य आहे.

आपले स्वरू प आपल्यातच असून आपणालाच त्याचा अनुभव येणार आहे, हे सोडून इतरांच्या टायी आपले स्वरू प पाहण्याचा प्रयत्न करणे हे व्यर्थ आहे. अज्ञानी पुरुषाला ज्यावर प्रीती करावीशी वाटते त्या प्रत्येक वस्तूपासून त्याला दु:ख उत्पन्न होते. ज्यापासून खरोखर आनंद होणार त्या वस्तूवर अज्ञानी प्रीती करीत नाही. पदार्थाच्या ज्ञानाविषयी भ्रम हे बंधाचे कारण व पदार्थाच्या ज्ञानाविषयी भ्रमाचा अभाव हे मोक्षाचे कारण आहे. बंध परद्रव्याच्या संबंधापासून होतो व परद्रव्यापासून आत्मा वेगळा आहे असा भेदविज्ञानाचा अभ्यास करण्याने मोक्ष प्राप्त होतो.

जो मनुष्य इंद्रियनिग्रह करू न क्षणमात्र आपले मन आत्म्याचा विचार करण्याकडे लावतो त्याला परमेष्ठीच्या स्वरू पाचे ज्ञान होते. ते असे- ((जो सिद्धात्मा तो मीच, जो परमेश्वर तोही मीच. त्याअर्थी माझ्या स्वरू पाहून इतरांच्या स्वरू पाचे स्मरण करण्याचे कारण नाही. कोणी मजहून इतर उपासना करण्यास योग्य नाही, तसेच मीही कोणाकडून उपास्य नाही. जो शरीराहून आत्मा वेगळा आहे असे जाणीत नाही, तो तीव्र तप करीत असला तरी कर्मबंधनापासून मुक्त होत नाही. ज्याला भेदविज्ञानरू पी अमृत प्राशन करण्याने आनंद झाला आहे, तो तीव्र तपश्चरण करीत असता शरीराला उत्पन्न होणाऱ्या कष्टापासून दु:खी होत नाही.((

ज्याचे अंत:करण रागद्वेषादिक मलापासून अलिप्त आहे तोच आपल्या स्वरू पाला चांगल्या रीतीने जाणू शकेल. इतर कोणत्याही रीतीने जाणू शकणार नाही. आपल्या अत:करणाला विकल्परहित करणे हेच मुख्य कर्म आहे. या उलट अनेक विकल्पांनी चित्ताला व्याकुल करणे अनर्थावह आहे. म्हणून सम्यक्त्वसिध्द्यर्थ चित्ताला विकल्परहित करा. जो अज्ञानाने आपल्या अंत:करणात अनेक विकल्प उत्पन्न करू न घेतो तो स्वस्वरू पापासून पराङ्मुख होतो व जो भेदविज्ञान आपल्या मनात जागृत ठेवतो तो परमात्मतत्वाला साक्षात पाहतो. उत्तम पुरुषांचे अंत:करण जर कधी मोहकर्माच्या वश झाल्याने रागद्वेषयुक्त झाले तर त्याला आत्मचिंतनाकडे प्रवृत्त करवून रागद्वेषांचा तिरस्कार करावा.

अज्ञानी जीव ज्या शरीरावर प्रेम करू न राहिला आहे. त्या शरीरावरू न आपल्या बुद्धीच्या शक्तीने ममत्व कमी करू न चिदानंद निजस्वरू पाकडे प्रवृत्त करावे हेच उत्तम पुरुषाचे आद्य कर्तव्य आहे. आपल्याच भ्रमामुळे उत्पन्न झालेले दु:ख आत्मज्ञानाच्या यथार्थ ज्ञानानेच नाहीसे होणारे आहे. आत्मज्ञानरहित पुरुषाचे परिभ्रमण पुष्कळ तपश्चरण केल्याने नाहीसे होणार नाही. बहिरात्म जीव, आपणाला रू प, आयुष्य, बल, धन, वगैरे सर्व ऐश्वर्य असावे अशी इच्छा करतो. अंतरात्मा जीव या उलट हे सर्व आपल्यापासून सुटावे अशी इच्छा करतो. अज्ञानी जीव पुद्गलादिक परपदार्थ आपले आहेत असे समजून कर्मबंध करतो तर अंतरात्मा ज्ञानी जीव आपले यथार्थ स्वरू प जाणून त्याविषयी आत्मबुद्धी करीत असल्याने कर्मबंधनापासून मुक्त होतो. अज्ञानी, पुरुषलिंग, स्त्रीलिंग व नपुंसकलिंग या तिन्हीला आपले स्वरू प जाणतो तर सम्यग्ज्ञानी या तीन लिंगविरहित आपले स्वरू प मानतो. चिरकाल अभ्यास करू न निर्णय केलेले ज्ञान अनादिकालाच्या भ्रमामुळे तत्काल नाहीसे होते. आपण जे हे साक्षात् रू प पाहतो ते अचेतन आहे का चेतन आहे ते आपल्या पाहण्यात येत नाही. म्हणून अचेतन पदार्थाविषयी प्रेम करणे हे व्यर्थ आहे. यापेक्षा आपण स्वानुभवगम्य प्रत्यक्ष

आत्म्याचाच आश्रय करणे चांगले. अज्ञानी बाह्य पदार्आथाचा त्याग करण्याकडे प्रवृत्त होतो व ज्ञानी अंतरंगातून कामक्रोधरागद्वे,ादि विकारांना परभाव जाणून त्यांचा त्याग करण्यास उत्सुक असतो. तसेच तो वचन व काय सोडून मनाने आत्म्याचा विचार करतो व विषयभोगादिकातील काही कर्मे वचनाने तर काही कर्मे कायेने करतो, विषयोपभोगाकडे आपले मन लावीत नाही. अज्ञानी जीवाला मात्र आपल्या विश्वासाचे, आनंदाचे स्थान जग आहे असे वाटते. पण ज्ञानी पुरुषाचा या जगावर विश्वास नसतो. त्याला त्यात आनंदही वाटत नाही. त्याला आपल्या स्वरू पातच आनंद व विश्वास वाटतो. तो आत्मकार्याशिवाय इतर कोमत्याही कार्याला महत्व देत नाही. असे असूनही त्या व्यवहारात काही कार्ये करावी लागतात, पण त्यविषयी त्यांचा अनादरच असतो ती कार्ये तो वाचेने अथवा शरीराने करतो, पण वास्तविक त्यचे त्यात अंत:करण वेधलेल नसते. तो मनात असे आणतो की, हे इंद्रियांचे विषय माझ्या स्वरू पाहून विलक्षण आहे. माझे स्वरू प आनंदाने परिपूर्ण व ज्ञानज्योतिर्मय आहे. मला तर ज्यायोगे भ्रम नाहीसा होऊन आपली स्थिती आपल्या रू पात स्थिर होईल तेच जाणणे योग्य आहे व तेच करणे व याचकरिता त्याचेच चिंतनही करणे योग्य आहे व तेच करणे व याचकरिता त्याचेच चिंतनही करणे योग्य आहे. इंद्रयांचे विषय चिंतण्यात आत्म्याचे कोणत्याही प्रेकारे हित नाही.

बहिरात्मा अज्ञानी जीव विषयावर प्रीती करतात. वरचेवर आत्मतत्त्वाचे स्वरू प सांगत असूनही जणू काय कधी ऐकलेच नसल्याप्रमाणे त्याचा अंगीकार रण्यास प्रवृत्त होत नाहीत. असा अज्ञानी जीवांना ते सांगणे व्यर्थ आहे. अज्ञानी जीवांना आत्म्याचा प्रभाव समजत नाही म्हणून ते परद्रव्यात संतुष्ट असतात. ज्ञानी मात्र बाह्य वस्तूवर प्रेम न करता आपले यथार्थ स्वरू प जाणून स्वस्वरू पातच संतुष्ट राहतात. मन-वचन-काया हेच आपले स्वस्वरू प असे जितके मानीत असतील तितके सर्व संसारपरिभ्रमण करणारे आहेत यात शंका नको. देहादिकाविषयी भेदविज्ञान होणे हेच संसाराच्या अभावाचे कारण आहे. वस्त्रे हे जुने होईल, पांढ रे होईल व घट्टही होईल. पण याप्रमाणे आत्मा जीर्णत्व तादिरू प होणार नाही. तद्वत देह हा जीर्ण झाला म्हणून आत्मा जीर्ण होत नाही. अज्ञानी जीवाला शरीर हे परस्पर मिळणाऱ्या व नाश पावणाऱ्या परमाणूंचा समूह बनलेले दिसत असल्यामुळे तो त्यालाच आत्मा जाणतो व अनादिकालापासून त्याचा हा भ्रम कायम आहे. ही दृढता, हे स्थौल्य, हा दीर्घपणा, ही शीर्णता, हा जीर्णपणा वगैरे धर्म पुद्गलाचे आहेत. हे धर्म आत्म्यात मुळीच नाहीत. आत्मा केवलज्ञानस्वरू प आहे. संसारात आत्म्याचा मनुष्याशी संयोग झाला असता शरीराच्या संबंधाने तो बोलू लागतो व त्या बोलण्याने मन चलायमान होते. मन चंचल झाले की भ्रम उत्पनन होतो. याप्रमाणे ही उत्तरोत्तर कारणे आहेत. याकरिताच ज्ञानी पुरुष या जगाचा संबंध सोडू पाहतात. पण बहिरात्मा अज्ञानी जीव घरात, गावात, पर्वतवनादिकात आपलेपणा मानतो. ज्ञानी अंतरात्मा जीव आपल्याच ठिकाणी आपला निवास आहे असे जाणतो. शरीराला आत्मा मानणे हे देह धारण करण्याची परंपरा चालू ठेवण्याला कारण आहे व आपल्या स्वरू पाला आपले मानणे हे दुसरे शरीर पुन्हा न प्राप्त होण्याचे कारण आहे. आत्मा स्वत:च मोक्षप्राप्त करू न घेतो व स्वत:च विपर्ययस्वरू पी होऊन संसारबंधन करू न घेतो. यामुळे हा आपला आपणच गुरु व आपला आपणच वैरी आहे, अन्य पदार्थ निमित्तमात्र आहेत. अंतरात्मा जीव, आत्मा हा शरीरापासून वेगळा मानून व शरीर आत्म्यापासून वेगळे जाणून, शरीर हे मलांनी भरलेल्या वस्त्राप्रमाणे जाणून त्याचा त्याग करतात. शरीराहून आत्मा हा वेगळा आहे असे वरचेवर अंतरात्मा जीव जोपर्यंत कनाने श्रवण करतात, जाणतात, मुखाने बोलतात, पण भेदविज्ञानाचा अभ्यास करण्यात मग्न होत नाहीत, तोपर्यंत त्यांचे शरीरावरील ममत्व नाहीसे होत नाही. आपला आत्मा शरीराहून भिन्न आहे याचे अशा रीतीने चिंतन करावे की, पुन: हा आत्मा देहाशी संलग्न असलेला स्वप्नातही पाहता येणार नाही. सारांश,

स्वप्नात देखील शरीर आणि आत्मा वेगळे दिसण्याइतकी ज्याची भावना दृढ झाली असेल तोच खरा भेदविज्ञानी म्हणता येईल.

व्रत अव्रताचा व्यवहार शुभाशुभ बंधाचे कारण आहे. मोक्ष हा बंधाचा अभावस्वरू पी आहे. म्हणून व्रतादिक क्रिया पूर्वावस्थेत करण्यायोग्य आहेत. प्रथम असंयमभाव सोडून संयमभाव धारण करावा. जेव्हा शुद्धात्मभावात अथवा परम वीतरागभावात स्थिरता प्राप्त होईल तेव्हा त्याला संयमभावाचीहि जरू री नाही. जाति व मुनिश्रावकांचे लिंग हे शरीराच्या आश्रयाने राहणारे आहेत व शसीरात्मकच संसार आहे, याकरिता ज्ञानी पुरुष जाति व लिंग याविषयी आत्मबुद्धी सोडून देतात. शरीराविषयी आत्मबुद्धी विद्यमान आहे, तो ज्ञाता व विद्वान् असूनही संसारापासून मुक्त होत नाही. ज्यला आत्मनिश्चय झाला असेल व तो निजल असेल अथवा सवधानतेने वागत असेल तरी तो संसारापासून मुक्त होतो. ज्ञानी स्वत:ला सिद्धस्वरू प मानीत असल्याने तो तसा होतो. वातही दिव्याशी जाऊन मिळते व आपण स्वत: तद्रूप होते.

आत्मा आपल्या आत्म्याचे चिंतन करीत असता परमात्मरू प होऊन जातो. जसे वृक्ष आपल्याच अवयवाशी घर्षण पावून अग्निरू प होतो तसे आत्माही परमात्मभावाशी जोडल्याने सिद्ध बनत. स्वप्नात आपल्या कोणी नाश केला आहे असे एखाद्याने पाहिले तरी वास्तविक त्याचा नाश झालेला नसतो. तद्वत हा जागृत असतानाही आपला नाश झाला असे मानतो तो निव्वळ भ्रम आहे. खरोखर आत्म्याचा नाश कधीच होत नाही. पर्याय उत्पन्न झाला तो नष्ट झाल्याशिवाय कसा राहील( आत्मस्वरू पाच्या अनुभवाशिवाय शरीरालाच आत्मा जाणून अनेक शास्त्रे पठन करणारा संसारापासून मुक्त होणार नाही. पण स्वस्वरू पाचा अनुभव करणारा शास्त्राभ्यास न करो, पण संसारातून मुक्त होणार नाही. पण स्वस्वरू पाचा अनुभव करणारा शास्त्राभ्यास न करो, पण संसारातून मुक्त होईल. ज्ञानी पुरुषांनो( तुम्हाला सुखावस्थेत प्राप्त झालेले ज्ञान दु:ख प्राप्त होताच नाहीसे होईल. दु:खावस्थेत अथवा रोगपरीषहादिक प्राप्त झाले असतानाही आत्मज्ञानाचा दृढ अभ्यास आपल्या आत्मस्वरू पाला जाणून परमात्मपद प्राप्त करू न घेण्याचा प्रयत्न करा. परमात्म्याचे दोन भेद आहेत. एक सकल व दुसरा विकल परमात्मा. घातिकर्माचा नाश करू न अनंतज्ञान, अनंतदर्शन, अनंतवीर्य, अनंतसुखरू प अठरा दोषरहित इंद्र, धरणेंद्र, नरेंद्राकडून वंद्य, अनेक अतिशयांनी युक्त, सर्वोपकार दिव्यध्यनिसंयुक्त, देवाधिदेव परमौदारिक देहात राहणारे अरिहंतदेव सकल परमात्मा होत. कल म्हणजे शरीर, ज्यांना शरीर असून, त्याचा अंत होईपर्यंत परमोपदेश देतात ते अरिहंत होत. त्यांना सकल परमात्मा म्हणावयाचे. अरि म्हणजे आठ अर्करू प शत्रुविरहित असतील ते सिद्धपरमेष्ठी. त्यांना शरीर नसते म्हणून त्यांना विकल परमात्मा म्हणतात. हे परमात्मपद लीन होणे हे आहे. बहिरात्मबुद्धि जीवाला मिथ्यात्व गुणस्थान असते. अंतरात्मा जीव चौथ्या गुणस्थानापासून बाराव्या गुणस्थानापर्यंत असतात. परमात्मा जीव देहसहित तेराव्या चौदाव्य गुणस्थानी व देहरहित परमात्मा सिद्ध भगवान गुणस्थानरहित असतात. कारण गुणस्थाने मोह आणि योगाच्या अपेक्षेने होतात. सिद्ध भगवंताला मोहकर्म व मनकवचनकायरू प योग हे दोन्ही नाहीत म्हणून त्यांना गुणस्थान नसते

धर्मध्यानाचे भेद

यापुढे धर्मध्यानाचे वर्णन करतात. धर्मध्यान हे सम्यग्दृष्टी पुरुषाशिवाय इतर मिथ्यादृष्टी जीवांना होत नाही, म्हणून चौथ्या गुणस्थानापासून प्रारंभ करून सातव्या गुणस्थानापर्यंत ते घडते. या ध्यानाचे आज्ञाविचय, अपायविचय, विपाकविचय, आणि संस्थानविचय असे चार भेद आहेत. यातून आज्ञाविचय धर्मध्यानाचे संक्षेपात स्वरूप पाहू.

भगवान सर्वज्ञांनी वर्णिलेल्या आगम-प्रामाण्यावरून पदार्थांचा निश्चय करणे याला आज्ञाविचय म्हणतात. जेथे उपदेश देणारा कोणी नसेल, कर्मोदयाने आपल्या बुद्धीला मंदपणा असेल व पदार्थांचे स्वरूप सूक्ष्म रीतीने सांगितले असून ते सिद्ध करण्यास हेतू व दृष्टांत दिलेले नसतील तेथे सर्वज्ञांनी सांगितलेल्या शास्त्राला प्रमाण मानून असे चिंतन करावे- ((हेच तत्त्व आहे. हे याच प्रकारचे आहे. इतर प्रकारचे नाही. सर्वज्ञ जिव भगवान वीतरागप्रभु अन्यथा प्रतिपादन करणारे नाहीत.(( याप्रमाणे गहन पदार्थाच्या स्वरूपाविषयी श्रद्धान दृढ करणे याला आज्ञाविचय धर्मध्यान म्हटले आहे. अथवा सम्यग्दर्शन धारण केल्यामुळे ज्याचे परिणाम शुद्ध झाले आहेत, ज्याने स्वमतपरमतातील पदार्थांचा योग्य निर्णय केला आहे, ज्याला सर्वज्ञकथित सूक्ष्म पदार्थांच्या स्वरूपाचे यथार्थ ज्ञान झाले आहे, तो पंचास्तिकायादिक पदार्थांचा निश्चय करून इतर भव्य जीवांना उपदेश देऊ लागतो, तो आपल्या उपदेशक्रमामध्ये श्रुतज्ञानाच्या सामर्थाने जैन सिद्धान्तात विरोध येऊ देत नाही. तो इतर मतानुयांचे सिद्धांत हेतुप्रमाणनय वगैरे युक्तींनी खोडून काढतो. अनेकात मताचे रहस्य समजल्यामुळे श्रोत्यांना पदार्थांचे यथार्थ स्वरूप समजून देण्याचे सामर्थ्य त्याला प्राप्त होते. जैनसिद्धान्ताचे प्ररूपण व समर्थन तर्कनयप्रमाणाला अनुसरून कसे करावे याविषयी चिंतन करण्यात सदैव तत्पर असणे व सर्वज्ञाच्या आज्ञेला धरून धर्माचा उद्योत करण्याचा प्रयत्न करणे याला आज्ञाविचय धर्मध्यान म्हणता येईल. याचप्रमाणे जो सर्वज्ञाच्या आज्ञेप्रमाणे पदार्थांचे स्वरूपचिंतन करीत असतो त्याला हे आज्ञाविचय धर्मध्यान घडते. जगात वस्तू अनंतगुणपर्यायात्मक आहे. तिचे उत्पादव्ययधरुवात्मक स्वरूप आहे. ती त्रिकालवर्ती आहे म्हणून नित्य आहे. अशा प्रकारच्या व्सतू स्वरूप निरूपण करणाऱ्या आगमातील एखादे सूक्ष्म निरूपण आपल्या जड बुद्धीमुळे जर समजण्यात आले नाही व जे हेतू व दृष्टांतांनी आपणास सिद्ध करता येत नाही, तेथे सर्वज्ञ वीतराग भगवान अन्यथा प्ररूपण करणार नाहीत, ते प्रमाणाला धरूनच प्रतिपादन करतील म्हणून त्यांची आज्ञा मान्य आहे, अशा प्रकारचे चिंतन करणे यालाही आज्ञाविचय म्हणतात. परमागमाचे पठन, पाठन, श्रवण, चिंतन, अनुभव वगैरे सर्व आज्ञाविचयात सामील करता येतात. जे शास्त्र सर्वज्ञवीतराग देवांनी सांगितले आहे, त्याचे श्रवण करण्यापासून रागी, द्वषी शस्त्रधारी देवांची उपासना सोडण्याचे मनात येते. परिग्रहधारी, विषयकषायी, अनेक वेष धारण करणाऱ्या खोट्या गुरूविषयी पूज्यपणा नाहीसा होतो. हिंसा करावी असे प्ररूपण केले असेल तो खरा धर्मच असू शकणार नाही अशी मनाची बालंबाल खात्री होते. ज्या शास्त्राचाय पठनपाठनापासून विषयकषाय-देह-परग्रहादिकाविषयी पराङ्मुखता प्राप्त होऊन दयामयी धर्माची वृद्धी करावी अशी भावना उत्पन्न होते, अशा शास्त्राच्या शब्दाच्या अर्थांचे चिंतन करणे हे देखील आज्ञाविचय धर्मध्यान होय. आगम हा श्रीसर्वज्ञवीतराग देवाचा उपदेश आहे, तो रत्नत्रयाला पुष्ट करणारा आहे, अनादिनिधन व सर्व जीवांचे रक्षण करणारा आहे, अनंतधर्म धारण करणाऱ्या पदार्थाचे स्वरूप प्रकाशित करणारा आहे. आजपर्यंत याला शरण न गेल्यामुळेच अनादिकालापासून चतुर्गतीत परिभ्रमण करावे लागले. हा आगम सप्ततत्त्व, नऊपदार्थ, पंचास्तिकाय यांचे स्वरूप प्रगट करणारा आहे. द्रव्यगुणपर्याय यांचे यथार्थ स्वरूप दाखविणारा आहे. गुणस्थान, मार्गणास्थान वगैरे द्वारा जीवांचे व आस्त्रव, बंध, उदय, उदीरणा, सत्ता यांचे निरूपण करणारा असून लोकालोकाचा प्रकाश करणारा आहे. अनेक शब्दांची रचना ज्यात आहे अशा अंगप्रकीर्णकादि रत्नांच्या योगे समुद्राप्रमाणे गंभीर आहे. एकांत विद्येच्या मदाने उन्मत्त झालेल्या मिथ्यादृष्टी जीवांचा मद नाहीसा करणारा आहे. मित्यात्वरूप अंधकाराला

नाहीसा करण्यात सूर्यासारखा आहे. रागरू पी सर्पाचे विष उतरविण्यास गारू डीविद्येप्रमाणे आहे. अंतरंगातील समस्त पापरू पी मल धुऊन टाकण्यास पवित्र जलाप्रमाणे आहे. हा आगम संपूर्ण वस्तूची परीक्षा करण्यास समर्थ आहे. योगीश्वरांचा हा केवळ तिसरा नेत्रच आहे. संसारातील संतापरू पी ज्वराचा घात करणारा आत्मसुखरू प अमृताला प्रकट करण्यास जणू चंद्रमाच उदयाला आला की काय असा भास उत्पन्न करणारा आहे. अक्षय, अविनाशी जीवांचे निजधन आहे. मुक्तीला गमन करणाऱ्यांचा हा मुख्य डोल आहे. विनय, संयम, संतोषादिक गुणांना उत्पन्न करणारा आहे. अशा प्रकारच्या परमागमाचे चिंतन, ध्यान, अनुभवन करणे हे आज्ञाविचय धर्मध्यान आहे.

अपायविचय धर्मध्यानाचे स्वरू प असे आहे- आजपर्यंत मिथ्यात्वदिकापासू नसंसारी जीव कसे दूर होतील याचा वारवार विचार करणे याला अपायविचन धर्मध्यान म्हटले आहे. सन्मार्ग म्हणजे मोक्षमार्ग याचा अभाव मिथ्यात्वनेच होतो. अर्थात मिथ्यात्वामुले जीवाला मोक्षपद प्राप्त होत नाही. मिथ्यात्वामुले ज्यांचे ज्ञानरू पी नेत्र मिटले त्यांची आचारविचारादि संपूर्ण कार्ये संसार वाढविणारी होतात. मिथ्यादृष्टी जीवामध्ये बहुतेक विपरीत ज्ञानाचीच बहुलता असते. जन्मांध पुरुष ज्याप्रमाणे मार्गदर्शक पुरुषाशिवाय गमन करू शकत नाही, तद्वत सर्वज्ञकथित सन्मार्गापासून पराङ्मुख झालेल्या जीवांना मोक्षाची इच्छा असली तरी यथार्थ धर्माचे ज्ञान असल्याशिवाय संसारात दीर्घकाल परिभ्रमण करावे लागते. म्हणून सन्मार्गाच्या नाशाच्या कारणांचा विचार करू न त्यापासून दूर राहणे हे अपायविचय धर्मध्यान म्हणविले जाते.

अथवा खोट्या मार्गाने जावयाचे नाही, खोट्या मार्काचा नाश करावयाचा असे चिंतन करणे देखील अपायविचय होय. विपरीत श्रध्दानाला धारण करू न खोट्या लोकांनी प्रतिपादन केलेल्या मार्गाने जाणार्या जीवांचा संसारातून उध्दार कसा होईल( अशा लोकांना कुदेव, कुधर्म, कुगुरु यांच्या उपासनेपासून कसे दूर करता येईल( असे चिंतन करणे हेही अपायिवचय धर्मध्यान होऊ शकते. पापांची जी कारणे असतील त्याविषयी आपल्या शरीराने तशी कृती न करणे, तोंडाने बोलून उत्तेजन न देणे व कोणी तसे कर्म करीत असता अनुमोदन न देणे यांचाही त्यात समावेश होतो. याच प्रमाणे कर्माचा नाश करण्याचा विचार करणे, पापकर्माच्या फळाचा विचार करीत राहणे हेही अपायविचय धर्मध्यान होय. सर्वज्ञांनी प्रतिपादन केलेल्या रत्नत्रयरू पी मोक्षमार्गाचा अवलंब न करता संसाररू पी अरण्यात चिरकालापासून बुडून मी अनेकप्रकारचे दु:ख भोगीत आहे. जिनेश्वराचा उपदेशरू प तारू न मिळाल्यामुळे मला तीव्र दु:खावस्था प्राप्त झाली आहे. याप्रमाणे अनेक कष्टरू पी अग्नीने भस्म होत असता मी संसाररू पी अरण्यात भ्रमण करीत करीत नुकताच सम्यग्ज्ञानरू पी तीराला लागलो आहे. आता या वरील मोक्षलक्ष्मीरू पी मंदिराच्या शिखराला जाऊन मिळणअयाचा प्रयत्न करीन. असे न कीन तर पुन: माझे या संसाररू पी अंधकूपात पतन होईल. अनादिकालाचे मिथ्यात्व, अविरत, कषाय ही कर्मबंधनाची कारण आहेत. जरी मी शुध्द, ज्ञानदर्शनस्वरू पाचा आहे तरी मी वरील मिथ्यात्वादि कर्मामुळे जखडू न गेलो आहे. मी चिरकालापासून संसाररू पी चिखलात फसून दु:खी होऊन राहिलो आहे. एका बाजूला अनेक प्रकारेचे कर्मरू पी सैन्य सज्ज होऊन उभे आहे व दुसऱ्या बाजूला माझा आत्मा एकटाच उभा आहे. अशा स्थितीत मला अत्यंत सावधान असले पाहिजे. यावेळी प्रमाद्रवश झालो तर कर्म माझ्या ज्ञानदर्शनरू पी स्वरू पाचा घात करू न एकेंद्रियादि पर्यायात नेऊन टाकील. प्रबल ध्यानरू पी अग्नीच्या द्वारे आत्म्यापासून समूळ कर्म नाहीसे केले पाहिजे. सुवर्णपाषाणातून जसे माती वेगळी काढू न सुवर्ण वेगळे काढतात तद्वत आत्म्यापासून कर्म वेगळे करू न त्याला शुध्द केले पाहिजे. सम्यग्दर्शन, सम्यग्ज्ञान व सम्यक् चारित्र हे माझे प्राप्त होण्यायोग्य असून ते माझे खरे स्वभाव आहेत. याशिवया इतर

परभाव आहेत व ते सर्व माझ्याहून भिन्न आहेत. माझे स्वरू प काय ( मला कर्मबंध कोणत्या कारणांनी कोतात ( बांधले गेलेल्या कर्माचा नाश कसा करता येईल( मुक्ती म्हणजे काय व ती कोठे आहे( तिचे स्वरू प काय( मुक्तीचे जर निराकुल, हबादारहित स्वभाविक सुख असे स्वरू प असेल तर ते सुख मला कोणत्या उपायांनी प्राप्त होईल( याप्रमाणए माझ्या स्वरू पाचे यथार्थ ज्ञआन झाले तर मला सर्व त्रिभुवनाचे ज्ञान होईल. सर्वज्ञ व सर्वदर्शी माझा स्वभाव आहे. तो कर्ममल नाहीसा होताच माझ्या ठाय.ी प्रकट होणार आहे. जोपर्यंत बाह्य व्सूशी माझा संबंध आहे तोपर्यंत मला माझ्या स्वरू पात स्थिर राहता येणे कठिण आहे. म्हणून बाह्य व्सतूंचा संबंध दूर होण्यास भेदविज्ञान अगोदर प्राप्त करू न घेतले पाहिजे. असा विचार याअपायिवचय नामक धर्मध्यानात केला जातो.

यापुढे विपाकिवचय नामक धर्मध्यानाच्या तिसऱ्या भेदाच्या स्वरू पाचा विचार करू न. ज्ञानावरणादिक कर्माच्या फलास आपल्याहून भिन्न मानणे याला विपाकिवचय म्हबणतात. याचा भावार्थ असा की, अनादिकालापासून जीवाला नरकतिर्यंचादि गती मध्ये उत्पन्न होईन मनुष्, पशू वगैरे पर्याय धारण करणे, इंद्रिये, शरीर, रू परसगंधवर्ण, संहनन, बल पराक्रम, राज्य वैभव, परिवार वगैरे सर्व प्राप्त होणे हे कर्माच्या उदयापासून उत्पन्न होणारे कार्य आहे. अर्थात् हे आपल्या निजस्वरू पाहून भिन्न आहे. आपले स्वरू प ज्ञानदर्शनात्मक अविनाशी अखंड आहे. कर्मोदयजनित परिणतीहून भिन्न आहे. या कर्मजनित परिणतीपासून आपण वेगळे आहोत असे जाणून, कर्मापासून उत्पन्न होणाऱ्या रागद्वेष-जीवन-मरणादिकांना देखील जो भिन्न पाहतो त्याला विपाकविचय धर्मध्यान घडते. पूर्वकाली बांधलेले कर्म द्रव्यक्षेत्रकालभाव यांच्या संयोगावने विचित्र फल देण्यास तयार होते. कर्माच्या मूलप्रकृती आठ आहेत. त्यांचे एकशे अठ्ठेचाळीस उत्तरभेद आहेत. यातून एकेकाचे असंख्यात लोकप्रमण भेद आहे. एकेंद्रियादिकापासून सर्व प्रकारच्या जीवांना वैगवेगळे उदय असलेले दिसून येतात. सामा४न्यतः जीवाचा ज्ञानस्वभाव आहे. तो स्वपरू पाला जाणाणारा आहे. जीव असंख्यात प्रदेशी असून देहप्रमाण आहे. सुखदु:खाचा भोक्ता ाहे. तथापि त्याने कर्माचा बंध वेगवेगळ्या परिणामांनी अनेक प्रकारचा करू न घेतला आहे. तो उदयकाली वेगवेगळा प्राप्त झालेला दिसून येो. सर्व जीनांवा लाभ, हानी, सुख, दु:ख, राग, द्वेष, पुण्य, पाप, ंयोग, वियोग, आयु, शरीर, बुध्दी, बल, पराक्रम, इच्छा वगैरे आपापल्या कर्मानुसार वेगवेगळ्या होत असतात असे आपण पाहतो.. एकाच्या इच्छेचा दुसऱ्याबरोबर मेळ नसतो. यावरू न अनेक जीवांची अनेक प्रकारची उदयांची जाति पासून आपण रागद्वेषाच्या आधीन होऊ नये. वनात विहार करणारा पुरुष लाखो वनस्पती लहान मोठ्या पाहात असतो. त्यापैंकी त्याने कोणावर प्रेम अथवा द्वेष करावा( काही वृक्षा उंच आहेत तर काही खुजे आहेत. काही वृक्षांची छाया दाट आहे तर काहींची फारच थोडी आहे. कित्येक वृक्षांना फळे फुले आहेत तर कित्येकांना ती नाहीत कित्येकांची फळे कडू तर दुसऱ्यांची गोड, कित्येकांची आंबट तर कित्येकांची तुरट. कित्येकांची विषारी वतर कित्येकांची अमृतासारखी गोड. कित्येकांच्या फळांनाकाटे तर कित्येकांची फळे वाकडे. कित्येकांची फळे नवीवन तर कित्येकांची जीर्ण. कित्येकांची सुगंधी तर इतरांची दुर्गंधी. याप्रमाणे अनेक प्रकारची स्वभाविक रचना पूर्वक्रमाच्या संस्खारामुळे झालेली आहे. एकेंद्रिय जीवांनाही कर्माचा उदय असतो असे दिसून येते. कारण फळांना आपण तोडतो. फाडतो, कातरू न टाकतो, छिलतो, शिजवतो, चावून टाकतो, चिरडतो, घासतो, चिरतो, गाळतो, वाळवितो, दळतो,बांधतो, मोडतो-याप्रमाणे अनेक क्रिया करतो. यावरू न एकेंद्रिय वनस्पतीमध्ये कर्माच्या उदयाच्या अनेक जाती पाहून व आपले अथवा इतरांचे पुण्यपापाच्य उदयाचे अनेक प्रकार पाहून साम्यभाव धारण करावा. त्याविषयी हर्षिवषाद बाळगू नये. कर्माच्या उदयाचे तरंग कित्येकक्षाणी वेगवेगळे होत असतात. ते भगवान सर्वज्ञवीतराग देवांनी ज्याक्षेत्रात, ज्या काली जसे पाहिले आहेत तेच प्रमाण आहत व ते तसेच होणार आहेत. सारांश, कर्माचा उदय

हा आपल्या स्वभावाहून भिन्न मानावा. अनेक जीव पुद्गलांची रचना, संयोगिवयोग वगैरे पाहून रागद्वेषरहित परमशआंतभा धारण कराव. शां,भाव धारण करण्याने पूर्वबध्द कर्माची निर्जरा होऊन नवीन बंध होणार नाही. याप्रमाणे तपाच्या प्रकरणात विपाकविचय धर्मध्यानाचे स्वरू प आहे.

यापुढे संस्थाविचय नामक धर्मध्यानाचा जो चोथा भेद आहे त्याचे स्वरू प असे आहे. आपणाला चोहीकडे दिसून येणारे हे अनंतानंत आकाश स्वत:च्याच आधारावर आहे. त्याला दुसऱ्या कोणाचाही आधार नाही. यांच्या् अत्यंत मध्यभागी जीव, पुद्गल, धर्म, अधर्म आणि काल ही पाच द्रव्ये जेव्ढ्या जागेत राहतात तेवढ्या जागेला अथवा क्षेत्राला लोक असे म्हणतात. हा लोक कोणी बनविलेला नाही. हा अनादिनिधन म्हणजे अनादिकालापासून बनलेलेलाच आहे.

यावर कोणी अन्यमतानुयायी अशी शंका करतात की, असा अनादिनिधन लोक असणे शक्य नाही. या लोकाचा अथवा जगाचा कर्ता कोणी तरी असलाच पाहिजे व ते कर्तृत्व ईश्वलाशिवया इतर ठिकाणी मुळीच संभवत नाही( म्हणून ईश्वर हा जगाचा कर्ता आहे. कर्त्याशिवाय कोणतीही सद्रूप वस्तू होऊ शकत नाही असा सामान्य नियम आहे.

अशी शंका करणाऱ्याला आम्ही असे विचारतो की, कोणी तरी कर्ता असल्याशिवाय जर कोणतीही सद्रूप व्सूत असू शकणार नाही असे आपण म्हमता त्याअर्थी ईश्वराला कोणी केले( ईश्वर ही सत्वस्तू आहे ना( त्याला करणारा कोणी तरी असलाच पाहिजे. ईश्वराला करणारा जर कोणी दुसरा महान ईश्वर आहे असे म्हणाल तर त्या महान ईश्वराचा कर्ता कोण( त्याचाही कोणी अन्य कर्ता म्हणाल तर पुन: त्याचा कर्ता कोण असा प्रश्न आहेच. याप्रमाणे एकाचा एक अशी परंपरा कधीही न संपण्याने अनवस्था दोष उत्पन्न होतो.

पुन: ईश्वरवाद्यास दुसरा प्रश्न असा की,प्रथमत: सृष्टी रचलेली नव्हती, ती मागाहून कोणी तरी केली असे आपले म्हणणे. अगोदर सृष्टी हा पदार्थच नव्हता तर त्याची रचना करणाऱ्या ईश्वराने कोणत्या जागी राहून सृष्टिरचना केली हे सांगा पाहू( यावर ईश्वर निराधार राहून तो फार दिवसापासून विद्यमान आहे असे म्हमाल, तर तो कोठे राहात होता( कोणत्या स्थानी बसून त्याने या सृष्टीची रचना केली( सृष्टी कशाचा आधार आहे( त्याला दुसऱ्या कोणाचा आधार आहे असे म्हणाल तर पुन: त्याला कोणाचा आधार गहा प्रश्न उपस्थित होऊन पूर्वीप्रमाणे अनवस्था दोष येतो. निराधार व अनादिनिधन अशा वस्तूवर तर्क करू नये, असे तुम्ही म्हणाल, पण त्यामुळे सृषअटीचा कर्ता कोणी तरी आहे हे म्हणणे सिध्द होत नाही. जैन तर सर्व पदार्थांना अनादिनिधन म्हणतात. ज्यांनीसृष्टीचा कर्ता मानलेला आहे त्यांच्या म्हणण्यातच दोष येतो. जग हे नाना प्रकारचे आहे.ईश्वर हा एकरू प आहे. अर्थात् एकरू प ईश्वराने नानारू प जग कसे बनविले हाही पण एक प्रश्नच आहे. दुसरे, ईश्वराला शरीर नाही तो अमूर्तिक आहे असे आपण म्हणता, मग अमूर्तिक अशा वस्तूकडून मूर्तिक असे शरीरादिक कसे बनविले गेले( अमूर्तिकापासून मूर्तिक पदार्थ बनविलता येतात असा नियम नाही. बरे, ईश्वराने ज्यावेळी सृष्टी रचली त्यावेळी त्याच्या जवळ उपकरणे-साधनसामुग्री कोणती होती( साधनासामुग्रीशिवाय ईश्वराला सृषिटिचरना करता येते काय( जगात उपादान कारण उपस्थित असल्याशिवाय कोमतीही वस्तू बनत नाही असे आपण पाहतो. माती असल्याशिवाय कुंभार गाडगे बनवू शकेल काय( ईश्वराने प्रथमत: सामग्री तयार केली, मग सृष्टि रचनेस प्रारंभ केला असे म्हणावे तरती सामग्री कशाने तयार केली( याचे उत्तर देताना पुन: अनवस्था दोष येतोच. जगाची रचना करण्यायोग्य सामग्री स्वत: सिध्द आहे, ती बनविण्यआला कोणाची जरू री नसली तर जगही स्वत:सिध्द मानण्याचा प्रसंग येईल व जसे जगाचा कर्ता स्वत: सिध्द मानता तसे जगही मानावे

लागले. ईश्वर समर्थ आहे. तो सामग्रीशिवाय फक्त व इच्छामात्रे करू न जगाची रचना करू शकतो असे म्हणण्याला काही प्रमाण ाहे काय( इच्छामात्रे करू न वाटेल ते करता येते असा एखादा सिध्दांत ठरल्यावर मग त्यात विचार करावयाचे ते काय उरले(

ईश्वर कृतार्थ आहे किंवा अकृतार्थ आहे( जर कृतार्थ म्हणजे त्याला करण्यायोग्य कार्य काहीच उरले नसेल तर जगाची रचना करण्याची इच्छा तरी कशी झाली( जर तो अकृतार्थ आहे असे म्हणाल तर तो सर्व जगाची रचना करण्यास समर्थ होणार नाही. यावरू न जगाचे कर्तृत्व ईश्वराकडे संभवत नाही.

दुसरे, कित्येक ईश्वराला अमूर्तिक, निष्क्रिय व सर्वव्यापी म्हणतात. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे जरी ईश्वराचे स्वरू प मानले तरी असा ईश्वर जगाला कसा बनवू शकेल हे समजणे कठिण आहे. जो स्र्वव्यापी म्हणजे सर्व पदार्थात व्यापून राहिलेला तो जगाची रचना कशी करणार( ईश्वर क्रियारहित म्हणजे निष्क्रियआहे असे मानले तर तो सृष्टी रचण्याकरिता कार्य करील हे कसे संभवेल( ईश्वराने सृष्टीला कोणत्या हेतून रचिले( तो तर कृतार्थ व कृतकृत्य आहे. त्याल धर्म, अर्थ, काम व मोक्ष या चारही पुरुषार्थातून काहीही करावयाचे उरले नाही. मग सृष्टि रचून त्याने काय फलप्राप्ती इच्छिली( पयोजनाशिवाय मूर्ख मनुष्य देखील कोणतेही काम करण्यास प्रवृत होत नाही असे आपण पाहतो. जो ईश्वराला सृष्टी रचण्यात कोणतेही प्रयोजन साधावयाचे नव्हते, त्याने निष्कारण रचना केली आहे असे म्हटले तर ईश्वर निरर्थक कार्य करणार ठरेल. ही निकरर्थक क्रिया ((ईश्वराची लीला(( आहे असे म्हणाल, तर त्याला मोहपरंपरा प्राप्त झाली. कारण आपले दु:ख विसरण्याचा प्रयत्न करित असतो. ईश्वराने ज्यावेळी जग रचिले त्यावेळी त्याने सर्व पदार्थ सुंदर व सुख देणारे अेच का निर्माण केले नाहीत( त्याने जगात कित्येक दारिद्री, दु:खी, रोगी, कुरुप, कुबुध्द, नीच जातीचे प्राणी तसेच विष, काटे, मल, मूत्र इत्यादि व तुष्ट, म्लेंच्छ, भिल्ल, सर्प, चांडाल वगैरे पदर्थ का उत्पन्न केले( बुध्दिमान असेल तो आपली सर्व बुध्दी खर्चून कोणतेही कार्य अत्युत्तम करण्याच प्रयत्न करीत असतो. ईश्वराने ज्यावेळी जग रचिले त्यावेळी त्याने सर्व पदार्थ सुमंदर व सुख देणारे असेच का निर्माण केले नाहीत( त्याने जगात कित्येक दरिद्री, दु:खी, रोगी, कुरू प, कुबुध्द, नीच जातीचे प्राणी तसेच विष, काटे, मल, मूत्र इत्यादि व दुष्ट, म्लेच्छ, भिल्ल, सर्प, चांडाल वगैरे पदार्थ का उत्पन्न केले( बुध्दिमान असेल तो आपली सर्व बुध्दी खर्चून कोणतेही कार्य अत्युत्तम करणअयाचा प्रयत्न करीत असतो. त्ापासून कोमतेही अनिष्ट व्हावे अशी मुळीच इच्छा नसते. मग ईश्वर तर अतुल, बुध्दिमान,समर्थ व स्वतंत्रअसूनत्याने ग्लानी येण्यासारखे भयानक, दु:खदायक व घाण अशा पदार्थांची उत्पत्ती का केली( यावर तुम्ही म्हणाल की मनुष्य प्राण्याने जसजशी कर्मे केली तदनुरू प ईश्वराने त्यच शरीरादिक सर्व सामग्री बनविली असे म्हणण्यत ईश्वराचे ईश्वरत्व ते काय राहिले( जसे कोष्ट्याला बारीक सूत दिले व त्याचे त्याने बारीक वस्त्र तयारकरू न दिले, जाड सूत दिले तरजाड वस्त्र बनवून दिले तर त्याने त्याचे महत्व ते काय( आपण सूत जसे दिले तसे त्ाने बारीक मोठे वस्त्र निर्माण केले.

संसारात प्राणी जी बरी वाईट अनेक कर्मे करतात ती आपल्या अभिप्रायाला अनुसरू न ईश्वर करवितो की, ईश्वराच्या अभिप्रायाशिवाय प्राणी आपल्याच इच्छेने करतो( जर ती कार्ेय ईश्वराच्या इच्छेने तो करीत असेल तर ईश्वराना जाणून बुजून आपल्या प्रजेकडून खोटी कार्ये कशी करविली( आपली संतानपरंपरा दुराचरणी व्हावी असे कोणी तरी इच्छील काय( जर ईश्वराची इच्छा नसताना प्राणी आपल्या इच्छेनुरू प कार्ये करतात म्हटले तर ईश्वराचे ईश्वरत्व व कर्तृत्व कोठे गेले( जग स्वत:च कर्मादिक कार्याचे कर्ता बनले यावर जसे कर्म केले असेल तसेच कार्य होईल

पण ईश्वराच्या निमित्ताने घडून येते असे म्हणाल, तर जी वस्तू आधीच सिध्द झाली आहे तिचा विनाकारण ईश्वराकडे संबंध लावम्यात काय मतलब(

ईश्वर सर्व प्रण्यावर प्रेम करामारा आहे. जगावर अनुग्रह करण्याकरिता त्याने ते रचले आहे असे तुम्ही म्हणता, त्याअर्थी त्याने सर्व सृष्टी सुखी व उपद्रववरहित रचावयास पाहिजे होती. पण जगात दु:ख, वियोग, दारिद्र व दैन्य चौहींकडे भरलेले दिसून येते आहे ते काय( याचा विचार करातना असे दिसून येते की, याही गोष्टीत ईश्वराचे प्रभुत्व राहिलेनाही यावर तुम्ही म्हणाल की, त्याने आपल्या भक्तांना सुखी, दुष्टांना दु:खी बनविले, यात त्याची प्रभुता नाही काय( पण ईश्‍वराने स्वत: होईन दुष्ट कां निर्ण केले( त्याला ापले सर्‌व भक्तच निर्णण करता येत नव्हेते काय( ईश्वराला प्रथम दुष्टाची कल्पना नव्हती, जेव्हा त्याने दुष्टांना पाहिले तेव्हा त्यांना शासन केले या म्हणण्यात ईश्वराचे अज्ञान प्रकट होते.

ईश्वर जी जगाची रचना करतो ती जग पूर्वी विद्यमान असलेले पुन: बनवितो की, पूर्वी मुळीच नसलेले अर्थात् नवीनच उत्पन्न करतो( जर पूर्वी असलेल्या जगाचीच रचना करीत असला तर जे पूर्वीपासूनच सत् अर्थात् विद्यमान आहे त्याची पुन: रचना ती काय करायची( पूर्वी मुळीच नसलेल्या पदार्थाची रचना करतो असे म्हणावे तर आकाशपुष्पाप्रमाणे तो पदार्थ अवस्तू ठरेल.

ईश्वराला तुम्ही मुक्त म्हणता ना( मुक्त असतात ते कोणतीही क्रिया करणे किंवा करिवणे याविषयी नेहमीउदासीन असतात. त्यांना सृष्टी रचावी असा विचार कसा उत्पन्न होईल( करणे किंवा करिवणे यांची चिंताच मुळी मुक्त जीवाठायी संभत नाही. ईश्वर संसारी असेल तर तो आप्लया सारखआ असाल पाहिजे. त्याला सर्व जग उत्पन्न करता येणार नाही. म्हणून (ईश्वर जगाचा कर्ता आहे( हे म्हणणे मुळीच सिध्द होत नाही. पहिल्यांदा जगाची रचना आपण करावयाची पुन: आपणच त्याचा संहार करावायाचा हा महान् अधर्म आहे.

(जगात दैत्यराक्षसादिक दुष्टांचा फार उपद्रव झाला म्हणणू ईश्वर त्याचा प्रलयकाली संहार करतो( असे म्हणाल तर अगोदर असे दुष्ट त्याने उत्पन्नच का करावे( हे लोक दुष्ट होतील हे त्याला समजले नव्हते म्हटले तर ईश्वर अज्ञानी ठरतो. त्याला आपल्या कृतीचे फल समजले नाही व त्यामुळे तो दु:खी बनून वरचेवर नवी रचना करीत आहे. रचना करण्ात चूक झाली असे आढळून आल्यास तिचा संहार करणअयास तयार होतो व दुष्ट कोठे असतात याचा शोध करू लागतो. दु:खाने व्याकुल झाल्यामुळे स्वत: प्रगट न होता दुष्टांना मारण्याकरिता तो हजारो उपाय, वेष, शस्त्रादिक सामुग्री एकत्र करण्याच्या विचारत व अनेकांचे साहाय्य कसे घ्यावे या विचारात मग्न होईन आपला जन्म सदैव दु:खात पूर्ण करतो असे म्हणावे लागेल. याप्रमाणे ईश्वरात अज्ञान, रागद्वेष, मोह वगैरे पुष्कळ दोष उत्पन्न होतात.

याकरिता इतर लोकांनी रचलेल्या असत्य शआस्त्रआपासून उत्पन्न होणार्या दु:खाचा विचार करू न वीतराग सर्वज्ञांनी प्ररू पण केल्या अनादिनिधन स्वत: सिध्द अशा जगाच्या स्वरू पाचेयथार्थ ज्ञान करू न घेऊन, तेच खरे आहे अशी दृढ श्रध्दा ठेवावी. जीव. पुद्गल, धर्म, अधर्झम, आकाश आणि काल ही सहा द्रव्ये अनादिनिधन आहेत. असत वस्तूचा उत्पाद करण्यास व सत् वस्तूंचा नाश करण्यात कोणीही कधीही त्रिकाली समर्थ होणार नाही हे पक्के लक्षात ठेवावे. उत्पाद, विनाश द्रव्यात होत असतात. म्हणून जे शास्त्रात वर्णन आहे ते पर्यापयार्थिक नयाच्या अपेक्षेने आहे. जेवढे म्हणून चेतन अचेतन पदार्थ आहेत. त्या सर्वांचा द्रव्यदृष्टीने कधीही नाश व उत्पत्ती होत नाही. प्रत्येक क्षणी

त्यातील पूर्व पर्यायाचा नाश व उत्तर पर्यायाचा उत्पाद होत असतो. द्रव्य हे द्रुव आहे व ते कधी उत्पन्न होत न ाही व नाशही पावत नाही. उत्पन्न होणे व नाहीसे होणे हे पर्यायाचे कार्य आहे. पर्याय हा कधींही एकरू पचा राहात नाही. द्रव्याचा नाश कधीच होत नाही. सहाही द्रव्यांच्या समुदायालाच लोक महणावयाचे, याशिवाय दुसरी वस्तू लोक नव्हे.

## द्वादशभावना

या संस्थानिवचय धर्मध्यानात बाराभावनांचे चिंतन निरंतर करणे योग्य आहे. म्हणून त्यांचे थोडेसे स्वरू प येथे सांगतो.त्या बारा भावनांची अनित्य, अशरण, संसार, एकत्व, अन्यत्व, अशुचि, आस्त्रव, संवर, निर्जरा, लोक बोधिदुर्लभ आणि धर्म अशी नांवे आहेत. या सर्वांचा स्वभाव भगवान् तीर्थकरांनी देखील चिंतन करू न संसारदेहभोगापासून विरक्ती प्राप्त करू न घेतली आहे. यावरू न या भावना वैराग्याच्या माता आहेत असे म्हटले आहे ते योग्य आहे. या भावांचे चिंतन करण्यापासून सर्व जीवांचे हित होते अनेक दु:खांनी व्यापलेलल्या संसारी जीवांना या भावनांना शरण गेल्याने दु:खमुक्त होता येते, दु:खरू पी अग्नीने संतप्त झालेल्या जीवाला, शीतल, मंद व सुगंध वायूंनी व्याप्त अशा कमलवनात जाऊन निवास केल्यासारखे सुख या भावांच्या चिंतनापासून होते. या भावना तत्त्वनिर्णयकरू न देणाऱ्या व अशुभ ध्यानाचा नाश करणाऱ्या आहेत. यांच्या चिंतनासारखे जीवाचे दुसरे कल्याण नाही. ह्या भावना द्वादशांग वाणीचे केवळ सार आहेत. म्हणून यांचे मोठ्या प्रेमाने या संस्थानिवचयधर्मध्यानात चिंतन करणे आवश्यक आहे. याला अनुप्रेक्षा असेही म्हणतात.

### १ अनित्य अनुप्रेक्षा

जगात दिसून येणारे सर्व पदार्थ अनित्य आहेत. देव, मनुष्य, तिर्यंच वगैरे सर्व प्राणी पाण्यावरील बुडबुड्याप३माणे अथवा अग्नीच्या ज्वालेप्रमाणे नाहीसे होतात. तसेच वैभव, ऋध्दी, संपत्ती व इतर परिग्रहही स्वप्नाप्रमाणे क्षणभंगुर आहेत. याचप्रमाणए धन, यौवन, जीवन वगैरे सर्व परिवारही विनाशिक आहे. पण मिथ्यादृष्टी जीव यांनाच आपले हित करणारे आहेत असे समजतात. ज्याला स्वरू पाचे ज्ञान असते तो पण याला आपले स्वरू प कसे मानील( आपणाला दिसणारे इंद्रियांचे सौख्या इंद्रधनुष्याच्या रंगाप्रमाणे नाहीसे होणारे आहे. तरू णपणाचा जोर सायंकालच्या सूर्याच्या लालीसारखा क्षणध्वंसी आहे. म्हणून हे माझे गाव, हे माझे राज्य, हे माझे घर, हे माझ धन, हे माझ कुटुंब असा विकल्प करणे व्यर्थ आहे. असा विकल्प मोहाच्या प्रभावाने हत असतो. जे पदार्थ आपल्या डोळ्याला दिसतात ते सर्व नाशवंत आहेत. या पदार्थांना पाहणारी, जाणणारी इंद्रिये पण अवश्य नष्ट होणारी आहेत हे जाणून आत्म्याचे कल्याण करण्यासाठी या सर्वांचे स्वरू प समजून घेणय्ाचा प्रयत्न करावा.

संसारात आप्तवर्गाच्या संबंधामुळे अनेक प्रकारची पापकर्मे आपणांस करावी लागतात. तो संबंध तरी नित्य टिकणार आहे काय( जहाजात परदेशी गमन करू इच्छिणारे अनेक देशाचे व अनेक जातीचे लोक असतात. जहाज इष्टस्थली पोहचवितात ते सर्व आपल्या जागी निघून जातात. तीराला जहाज पोहोचेंपर्यंत सर्व एके ठिकाणी असतात, पुढे ते एकत्र राहात नाहीत. याप्रमाणे जगात कुल ही एक नाव अथवा जहाज आहे. याकुलात अनेक गतीतून जीव येऊन उत्पन्न होतात, आपले आयुष्य पूर्म झाले म्हणजे आपापल्या कर्मानुसार चारही गतीत जाऊन उत्पन्न होतात, म्हणून आप्तवर्गाचा संबंध टिकणारा आहे असे मानू नये.

ज्या शरीराच्या संबंधाने स्त्रीपुत्र, मित्रबांधव आपले आहेत असे वाटते, ते शरीर देखील अग्नीत भस्म होणारे आहे, अथवा त्याला पुरल्यास जमिनीत मिळून जाणारे आहे अथवा या शरीराचे दोन्ही संस्कार न करता एखाद्या मनुष्यभक्षक हिंस्त्रपशूच्या भक्ष्यस्थानी टाकले तरी त्याचे विष्ठेत अथवा कृमिकलेवरात रूपांतर होऊन त्याचा एकेक परमाणू जमिनीवर अथव आकाशात विखरून जाणारा आहे. पुन: या शरीराचा संबंध प्राप्त होणार नाही असे जाणून, स्त्रीपुत्रादिकांच्या मोहाने आपला धर्म बिघडवू नये. आपल्या ज्या स्त्रीपुत्र, मित्रबांधव, स्वमिसेवकादिकाशी मिळून राहून सुखाने कालक्रम करावे असे इच्छितो ते सर्वकुटुंबी लोक शरदऋतूतीलढगाप्रमाणए विखरून जाणारे आहेत, त्याचा संबंधही नाहीसा होणार आहे.

याशिवाय इतर पदार्थ म्हणजे जे राज्य, जी जमीन, जी हवेली व जे उपजीविकेचे साधन तुम्ही आपले मानून त्याकरिता हिंसा, असत्य, कपट वगैरे करण्यास प्रवृत्त होता व अनेक जीवांना लुबाडून आपल्या पोटाची खळगी भरता, आपल्या शक्तीच्या व स्तेच्या जोराने निर्बलाला धमकावून, त्यापासून बळजबरीने पैसे लुटात, त्या सर्व परिग्रहाचा संबंधही कायम राहणार नाही य:कश्चित उपजीविकेकरिता नरकतिर्यंच गतीत अनंतकालपर्यंत अनंतदु:काची परंपरा तुम्हाला यापासून प्राप्त होणारी आहे, म्हणून वरील अन्याय प्रवृत्ती करण्याचा विचार मनात आणू नये. अनित्य परिग्रहाच्या स्वामित्वाकरिता व अभिमानाकरिता आजपर्यंत कित्येक विलयाला गेले व अजडूनही कित्येक जात आहेत म्हणून अन्याय प्रवृत्तीचा परिहार करून आपरल्या आत्म्याचे कल्याण होईल अशा मार्गाचे अवलंबन करावे.

आप्तवर्गादिकाबरोबर आपला जो संबंध जडलेला आहे, तो उन्हाळ्यात चव्हाटा असलेल्या वृक्षाच्या छायेखआली अनेक देशांचे पांथस्थ येऊन विश्रांती घेतात त्या प्रकारचा आहे. झालाच्या सावलीतक्षणमात्र विसावा घेऊन पथिक लोक ज्याप्रमाणे आपापल्या गावी निघून जातात, तद्वत संसारात कुलरूपी वृक्षाच्या छायेखाली हे कुटुंबीजन राहून आपापल्या कर्मानुसार अनेक गतीत भ्रमण करण्याकरिता नूघून जातील. तुम्ही ज्यावर अतिशय प्रीती करीत आहांत, ती माणसे देखील मतलबी आहेत. डोळ्यातील लालीप्रमाणे त्याजवरील प्रीती नाहीशी होणारी आहे. एखाद्या ढगावर सायंकाळच्या वेळी जसे अनेक पक्षी पूर्वसंकेतापवाचून येऊन बसतात त्याचप्रमाणे आपल्या कुटुंबात देखील अनेक माणसे येऊन, उत्पन्न होऊन आपापल्या कर्मानुसार पुन: नाहीशी होतात.

हे सगळे धन, ऐश्वर्य, आज्ञा, राज्य व इंद्रियांच्या विषयांची सामग्री वगैरे पाहता पाहता नाश पावणारी आहे. तारुण्य हे दोन प्रहराच्या सावलीप्रमाणे चंचल आहे ते स्थिर राहणारे नाही. चंद-सूर्य-ग्रहनक्षत्रादिकांचा अस्त झाला तरी पुन: पुन: त्यांचा उदय होणारा आहे( वसंतग्रीष्मादिक ऋतू गेले तरी पुन: येणारे आहेत, परंतु एकदा नष्ट झालेले इंद्रिय, यौवन, आयुष्य, शरीरादिक मात्र पुन: कधीही येणारे नाहीत. जसे पर्वतावरून पडणार्या नदीचे तरंग अप्रतिबंधकतेने नाहीसे होतात तद्वत आयुष्य हे प्रत्येकक्षणी नाहीसे होते.

ज्या शरीराच्या आधीन आपले जीवन आहे त्या शरीराला जर्जर करणारी जरा प्रत्येक समयाला जवळ जवळ येत चालली आहे.ती तारुण्यरूपी वृक्षाला दग्ध करण्यास दावाग्नीसारखी, सौभाग्यरूपी पुष्लाला जलवृष्टीसारखी, स्त्रीच्या प्रीतिरूप हरिणीला वाघासारखी, ज्ञानरूपी नेत्राला मिटिवण्यास धुळीच्या वृष्टीसारखी, तपरूप कमलाच्या वनाला बर्फासारखी, दैन्य उत्पन्न करण्यास आईसारखी, तिरस्कार वृध्दिगंत करण्यास शीघ्रगामिनी स्त्रीसारखी, उत्साह नाहीसा करण्यास तिरस्कारासारखी, रूपरूपी धन चोरून नेणारी, शक्ती नष्ट करणारी, पायातील शक्ती हरण करणारी,

आळस वाढ पारी व स्मरणशक्ती नाहीशी करणारी आहे. यमाला बोलावू पाठिवलेल्या दूतस्त्रीप्रमाणे असणारी अशी जरा प्राप्त झाली म्हणजे आत्महिताचे विस्मरण होते. वरचेवर मनुष्यजन्म, सत्कुल, जैनधर्म यासारखी सामग्री प्राप्त होत नसते. जोपर्यंत तुमच्या नेत्रात तेज, पायात जोर आणि आत्म्यात विचार करण्याची शक्ती आहे तोपर्यंतच याचा विचार करा.इंद्रियातील शक्ती प्रतिसमयास कमी होत आहे. ती नाहीशी झाल्यावर आत्मकल्याण कसे करणार(

हा सर्व संयोगवियोगस्वरूपाचा आहे. विषयपणामुळे कोणाचे कल्याण झाल्याचे उदाहरण नाही. उलट असंख्यात जीवाचे अकल्याण झाल्याची उहदारणे प्रत्येही आढळून येतात. बाबांनो, हे इंद्रियांचे विषय व इंद्रिये ही दोन्हीही नाहीशी होणारी आहेत. तुम्ही कोणाकरिता आत्महित सोडून घोर पापाचा बंध करित आहात( दिवसेंदिवस विषयप्रीतीत कोमाकरिता लीन होत आहात( हे सर्व विषय तुमच्या अंत:करणात तीव्र दाह उत्पन्न करून नाहीसे होतील. शरीर हे रोगाने सदैव भरलेले आहे. जीवन मरणयुक्त आहे. ऐश्वर्य नाशाच्या सन्मुख उभे राहिलेले आहे. संयोगाचा खात्रीने वियोग होणार आहे. इंद्रियांचे सर्व विषय आत्मस्वरूपाची भुरळ पाडणारे आहेत. यांच्या नादी लागल्याने सर्व जीव आपला नाश करून घेत आहेत. यावरून विषयसेवनापासून सुख इच्छिणारे मूर्ख लोक पुष्कळ दिवस जगावे म्हणून विषप्राशन मोह आणि मद उत्पन्न होतो, म्हणून त्यावरील प्रेम सोडून आत्मकल्याण करण्याचा प्रयत्न करावा.

मरण अचानक प्राप्त होईल. हा मनुष्यजन्म व जिनधर्म नाहीसा झाल्याने पुन: अनंतकाल गेली तरी प्राप्त होणे दुर्लभ आहे. नदीवरील तरंग एकदा उत्पन्न झाले की ते नाहीसे व्हावयाचेच पुन: ते परत ययावयाचे नाहीत. तद्वेत आयुष्य, शरीर, रूप शक्ती, सौंदर्य वगैरे नाहीसे झाले म्हणजे पुन: कधीही प्राप्त होत नाहीत, शरीर एकदा नाहीसे झाले म्हणजे तुम्हाला प्रिय असणारे जे स्त्री, पुत्र मित्रादिक यांचा संयोग स्वप्नासारखा आहे असे समजून त्यांच्या करिता अनीती, पाप करण्याचे सोडून तत्काल शील, व्रत संयम वगैरे धारण करा.

हे जग इंद्रजाल विद्याप्रमाणे भ्रम उत्पन्न करणारे आहे. यात धनयौवनजीवन, स्वजन, परजनाचा समागम होतो. त्यामुळे जीव मोहाने आंधळा होतो. पण ही धनसंपदा चक्रवर्तीवजळ स्थिर राहिली नाही ती अन्य पुण्यविहीन प्राण्याजवळ कशी स्थिर राहील( तारूण् हे जरेने नष्ट होईल. जीवन मृत्यून व स्वजनपरजन वियोगाने नष्ट होणारे आहेत. यातून चिरकाल कोण राहील असे तुम्हाला वाटते( या शरीराला दररोज तुम्ही स्नान घालून स्वच्छ करता, अनेक अत्तनरांनी सुगंधित करता, मौल्यवान वस्त्राभरणांनी सुशोभित करता, अनेक प्रकारच्या मधुर व मिष्ट भोजनांनी पुष्ट करता, याप्रमाणे रात्रंदिवस या शरीराचेच दास्य करण्यात आपला काल घालिवता. शय्या, आसन, काम भोग, निद्रा, शीत, उष्ण वगैरे अनेक उपकार करून पुष्ट करीत आहात व याच्या प्रेमपाशात सापडलेले आहात. त्यामुळे भक्ष्य, अभक्ष्य, योग्यायोग्य, न्यायान्याय यांचा विचार न करता आपला प्रिय धर्म टाकणअयास तयार होत आहात. एवढेच नव्हे पण या नाशवंत शरीराकरिता कीर्ती गेली तरी बेहेत्तर, प्रसंगी मृत्यू आला तरी पत्कला, वेळेवर नरक राहो पण निगोदात राहावे लागले तरी कबूल करीत आहात. असली संकटे म्हणजे शरीराच्या प्रीतीपुढे काहीच नाहीत अशी तुमची समजूत झाली पण हे शरीर पाणी भरलेल्या काचेच्या भांड्याप्रमाणए नष्ट होणारे आहे, याची तुम्हाला कल्पना देखील नाही. या शरीरावरउपकार करणे म्हणजे कृतघ्नावर उपकार करण्यासारखे आहे. यावर जितका तुम्ही उपकार कराल तितकेचते तुम्हाला सापाला पाजलेल्या दुधाप्रमाणे विपरीत फल देणारे आहे. या शरीरावर फाजील प्रेम करण्याने तुम्हाला महादु:ख,रोग, क्लेश, दुर्ध्यान, असंयम, कुमरण, नरकपतन वगैरे निश्चयाने प्राप्त होणारे आहे. या शरीराला जसे जसे तुम्ही विषयादिकांनी संतुष्ट करीत रहाल तसेतसे ते तुमच्या आत्म्याचा अधिक नाशकरण्यास समर्थ होईल. शरीराला

जर तुम्ही एक दिवस जेवण न दिले तर ते तुम्हास दु:खाने व्याकुळ करते.आजपर्यंत ज्यांनी ज्यांनी शरीरावर प्रेम केलेआहे त्या सर्वांची गती संसारात चांगली झाली नाही. त्यांचे आत्मकार्य बिघडून अकेर अनंतानंत काल नरकनिगोदात ब्रमण करावे लागले आहे. पण ज्यांनी वेळेवर सावध होऊन शरीराला तपश्चरणाकडे लावून कृश केले आहे, त्यांनीच आपले हित करू न घेतले आहे.इंद्रियांना जसजसा विषयभोग मिळेल तसतशी ती तृप्त न होता उलट त्यांची भोगेच्छा वाढ तच जाते. एकेक इंद्रियांच्या वश झाल्याने चक्रवर्ती राजे भ्रष्ट होऊन नरकात गेले. म्णून इंद्रियांना, दु:ख देणारे, पराधीन करिवणारे, नरकाला पोहचिवणारे जाणून त्यावरील प्रेम टकून, आपल्या वश करू न घ्यावे. जगात मनुष्यप्राणी सर्व निंद्य कर्मे इंद्रियांच्या वश झाल्यामुळे करीत असतो, म्हणून इंद्रियरू पी सर्वाच्या विषापासून आपल्या आत्म्याची रक्ष ा करावी.

आपण नाशवंत लक्ष मीवरही अतिशय प्रेम करतो. परंतु ती कशी आहे, याचा विचार करीत नाही. लक्ष मी ही क्ष णभंगुर असून कुलीन पुरुषाशीरममाण होणारी नाही, ती शूर,वीर, धीर, कुशल,पंडित, मूर्ख, सुरू पी, कुरुपी, भित्रे, धर्मात्मा, अधर्मी, पापी, दातार, कृपण यापै की कोणाजवळही सदै व रहात नाही. ज्यांनी पूर्वी पुण्य के ले असेल त्याजवळ ती दासी होऊन राहणारी आहे. ही कुपात्राला दान दिल्याने व खोटे तपश्चरण केल्याने उत्पन्न होते. आपल्या मोहाने जीवाला कुमार्ग व कुभोगाकडे प्रवृत्त करू न दुर्गतीला पोहोचिवते. सत्या चालू असलेल्या पंचमकालात तर ही वरील कारणांनीच प्राप्त हबोते व बुध्दीला भ्रम उत्पन्न करू न अनन्वित कृत्ये मनुष्याच्या हातून घडविते. ही महत्प्रयासाने प्राप्त होते व प्राप्त झाली तरी तिचा उपयोग पापिवषयक उपभोगाकडेच अधिक व्हावयाचा. ही जवळ असतांना सत्पात्रदान, विद्यादान, अभयदान, औ षधदान वगै रे देण्याचीक् वचितच बुध्दी उत्पन्न होते. लक्ष मीमुळे सदै व आर्तध्यानातच परिणाम रममाण होऊन तिर्यंचगतीत उत्पन्न व्हावे लागते. लक्ष मीपासून तृष्णआ वाढ ते, मद उत्पन्न होतो, म्हणून हिचा उपयोग दु:खी, दरिद्री लोकांच्या उपकाराकडे, धर्मकृत्ये वाढ विण्याकडे, धर्मायतने व विद्यालये बनविण्याकडे, विद्या शिकिवमअयाकेड व वीतरागिसध्दतांचा प्रसार करिवम्याकेड करू न हिला सफल करावे. न्यायप्राप्त लक्ष मीचा उपयोग मर्यादित व प्रमाणिक भोगोपभोगाकडे करावा. तसे करीत असताना धर्माचा घात होणार नाही हे लक्ष ात ठेवावे. ही सदै व पाण्यावरील तरंगाप्रमाणे चंचल आहे असे जाणून प्रसंग प्राप्त झाला असता दान व परोपकार करू न घ्यावा ही परलोकी बरोबर यावयाची नाही. मृत्यू अचानक प्राप्त झाला असतां हिला इथेच टाकून तुम्हाला जावे लागेल. जे द्रव्याचा सत्कर्माकडे मुळीच उपयोग न करता सदै व संचय करण्यातच गुंतलेले असतात, ते स्वत: आपल्यालाच फसवून घेतात हे लत्यांच्या लक्ष ात येत नाही. अनेक प्रकारची पापकर्मे व न्याय-अन्याय याकडे लक्ष ा न देता पुष्कळ लक्ष मी संपादन केली, मरण येण्याच्या अगोदर ती आपण कोणाच्याही हाती दिली नाही व अन्य देशात व्यापारादिक साधनांनी तिची वृध्दी करण्याचे मनात आणले, तरी तिचय रक्ष णाची व नफा-नुकसानीची रात्रंदिवस चित्तला व्यग्रता असणारच. तसे नकरता ती जमिनीत खोल पुरू न ठेवली तरी काय झाले( पुन: ती कोणी काढ ून तर नेणार नाह ना( हा विकल्प उभा लाहेच. सारांश-रात्रंदिवस हिच्याय चितनात दुर्ध्यान करावे लागून अखेर तिचे फल दुर्गती ठेवलेली. सर्व जन्मात द्रव्य-एकीकरण व तिच्चिंतन या दोन कार्याशिवाय इतर विचारास क्ष णभरही ज्याच्या हृदयात थारा मिळाला नाही त्याला सद्गती कोणत्या आधाराने प्राप्त व्हावी हाही प्रश्नच आहे. कृपण मनुष्य लक्ष मीचा दास आहे. तो तिचे रक्ष ण करीतच राहणार, दास पुरुषाला भोगावयाचा अधिकर कोठला( लक्ष मी खोल जमिनीत पुरुन ठेवली याचा अर्थ तिला इतर दगडाप्रमाणे बनविले. जमिनीत अगोदरच पुष्कळ दगड असतात त्यात हिचाही समावेश केला, यात कृपणाला काय उपयोग झाला( कृपणाच्या मागे कोणा तरी त्याच्या वारसाच्या अथवा राजाच्य हात ती लागेल. कृपणाच्या हातून कोणताही परोपकार

होत नाही. सारांश-द्रव्यासाठी जगात आत्म्याला ठकविणारी दुसरी कोणतीही वस्तू नाही. लोक आपला सर्व परमार्थ बाजूला ठेवून हिच्या लोभाने रात्रंदिवस अनेक अन्याय करीत असतात. त्यांना वेळेवर अन्न मिळत नाही. थंडी, वारा, पाऊस यांच्या वेदना ते सहन करतात. रोग व कष्ट प्राप्त झाले तरी त्यांना ते समजत नाहीत. सदैव द्रवायंचे चिंतन करण्यात रात्री त्यांना झोप येत नाही. फार काय, द्रव्यलोभी मनुष्य प्रत्यक्ष द्रव्यपायी मरण प्राप् होते असे समजले तरी त्याला मोजीत नाही. यापेक्षा लोभाची अधिक सीमा ती कोणती उरली( याहून कमी जी प्राणसंकटे म्हणजे लोभाकरिता लढ आऊत जाऊन यध्द करणे, समुद्रात जाऊन खलाशाच काम करणे, उंच पर्वतावर जाणे, जेथे कोणी आपल्या जातीचे, गोताचे, कुलाचे, विहाळ्याचे दिसणार नाही अशा प्रदेशात जाणे यात काहीच विशेष नाही. याप्रमाणे लोभाच्या आशेने जीव अनेक ठिकाणी भ्रम करून अखेर दुर्गतीला जातो. लोभी पुरुष न करण्यासारखे किंवा नीच, हलके लोक करतील अशी कृत्ये देखील करणअयास तयार होतो. इतके दिवस न समजता अथवा समजून झाले ते गेले. पण आपण जैनकुलातउत्पन्न झालो आहोत, आपणाला भगवंताचे शासत्र श्रवण करण्याच प्रसंग सुदैवाने प्राप्त होत आहे, त्याअर्थी संतोषवृत्ती धारण करू य. आपल्या पुण्याईप्रमाणए न्यायमार्गाने मिळेल तेवढ्यात संतोष मानू य. द्रवयाविषयी मनात वसत असलेली गाढ प्रीती सोडून न्यय विषयोपभोग घेऊ या. दु:खित, भुकलेले, दीन, अनाथ असतील त्यावर उपकार करण्याकडे आपल्या सपततीचा उपयोग करू य. आजपर्यंतलक्ष्मीच्या नादी लागून अनेक लोक फसून दुर्गतील गेले. तिच्या संबंधाने जगातील सर्व जीन निश्चेष्ट होत आहेत. पुण्याचा अस्त झाला असता ती नाहीशी होणार आहे, केवळ हिंचा संग्रह करून आपण मरून जावे हे लक्ष्मी संपादन केल्ाचे फळ नव्हे. लक्ष्मी प्राप्त झाल असता तिच्या सहाय्याने गरिबावर उपकार करावा अथवा धर्ममार्ग चालू करावा तर तिचे योग्य फल झाले असे होईल. खरोखर जे लक्ष्मीला पापरूप जाणून मुळी ग्रहणच करीत नाही, ते धन्य होत. पण ज्यांनी प्रथमत: ग्रहण करून नंतर तिच्यावनरील प्रेम सोडून त्याग केला ते अधिक धन्य होत. सारांश- हे धन, यौवन, जीवितव्य, कुटुंबचा संयोग वगैरे पाण्यावरील बुडबुड्यप्रमाणे नश्वर आहेत म्हमून आतम्यचे हित होईल अशी कार्ये करणयकडे प्रवृत्त व्हा. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे संसारात जेवढी म्हमून सयोगार्ची कार्य घडून येतत ती विनाशिक आहेत असे पक्के समजा.याप्रमाणे अनित्य भावनेचे स्वरूप चिंतन करावे व शेवटी असा विचार करावा की, हे पुत्र-पौत्र-स्त्री-कुटुंब वगैरे आजपावेतो परलोकी कोणी कोणाबरोबर गेलेले नाहीत व पुढे कधीही जावयाचे नाहीत. आपण उपार्जन केलेले फक्त पुण्य व पाप हेच आपल्याबरोबर येणार आहे. जाति, कुल, रूप, देश वगैरेचा समागम शरीराबरोबर येथल्या येथेच राहील असे जाणून अनित्यभावनेचे क्षणममात्रही विस्मरण होऊ देऊ नये.

## २ अशरणानुप्रेक्षा

संसारात देव, दानव, इंद्र, मंत्र, तंत्र यापैकी कोणीही शरण आलेल्यांचे दु:ख निवारण करण्यास समर्थ नाही. यमराजाच्या तडाख्यातूनही यापैकी कोणीही सुटलेले नाही. आयुष्य पूर्ण होताक्षणीच इंद्र देखील कालवश होतो. ज्या इंद्रच्या ताब्यत असंख्यात देव असतात, ज्याची आज्ञा होताच हजारो ऋध्दिधारी देव हात जोडून पुढे येऊन उभे राहतात, जो स्वर्गामध्ये अनेक प्रकारचा सुखआनुभव घेत हजारो वर्षे निवास करतो, ज्याच्या शरीरात रोग, क्षुधा, तृष्णा वगैरेचा उपद्रव्य होत नाही, जो अतुल प्रराक्रमी असतो त्यालाही मृत्यूने सोडले नाही. त्याअर्थी इतरांचे मृत्यूपासून रक्षण करणअयास कोण समर्थ होईल( मृत्यू प्राप्त झाला असात निर्जन अरण्यात वाघाच्या दाढेत सापडलेल्या हरिणाच्या पिलाचे कोण रक्षण करू शकतो( तद्वत मनुष्य प्राण्याचेही येथे रक्षण करण्यास कोणी समर्थ नाही. जगात आजपावेतो

अनंतानंत पुरुषांचा नाश झाला आहे. त्यांचे कोण रक्षण केले( मृत्यूपासून रक्षण करणारा कोणी असता तर मनुष्य अमर झाला असता. परंतु तो अमर आहे असे अजून तरी ठरले नाही. त्याअर्थी आपण कोणास शरण गेलो म्हणजे आपले रक्षण होईल अशा मिथ्याबुध्दीचा त्याग करावा.

संकटप्रसंगी आपण आपल्या हिताकडे लक्ष दिले नाही, म्हणू आपले नुकसान झाले. शरीरात रोग उत्पन्न झाला असता आपणाकडून उपाय करण्यात कसूर झाली अथवा आपल्या इष्ट देवतेला शरण गेलो नाही. त्यामुळे अखेर त्या रोगात त्याचा अंत झाला, याप्रमाणे आपल्या कुटुंबातील मृत मनुष्याविषयी शोक केला जातो. त्यावेळी आपण यमाच्या दाढेत सापडलेले आहोत. आज नाही उद्या आपलीही तीच गत होणार आहे. कोट्यावधी उपाय केले तरी ज्या कालाने इंद्राला सोडले नाही तो काय आपल्या मनुष्याकडून रोकाल जाईल( आज अमुक मनुष्य मरण पावला, उद्या दुसरा मरण पावला असे आपण पाहतो, त्याच प्रमाणे आपणही एके दिवशी अवश्य मरणार आहोत. जसा इतर मनुष्यांना स्त्री-पुत्र-मित्रांचा वियोग होतो तसा आपणासही होईल. त्यावेळी कोणाला शरण गेले म्हणून वियोग अथवा मरण होण्याचे थोडेच थांबणार आहे ( अशुभ कर्माचा उदय प्राप्त होण्यानेच बुध्दीला भ्रम उत्पन्न होतो. प्रबलकर्माचा उदय असला म्हणजे कसलाही उपाय फलद्रूप होत नाही. अशा प्रसंगी अमृताचे विष, तृणाचे शस्त्र होऊन ते आपला घात करते. आपले जीवस्य कंठस्य मित्र देखील हाडवैऱ्याप्रमाणए वागू लागतात.

शुभकर्माचा उदय प्राप्त होतो त्यावेळी मूर्ख मनुष्यातही बुध्दीचे तेज चमकू लागते. काहीही प्रयत्न न करता आपोआप सुखसामुग्री येऊन मिळते. वैरी मित्रासारखा व विष अमृतासारखे बनते. पुण्याचा उदय असताना उपद्रव देणाऱ्या सर्व वस्तूपासून सुख प्राप्त होते. म्हणून मनुष्यप्रमाण्याल दु:खमुक्त होण्यास, शरण जाण्यास योग्य कोणी असेल तर तो धर्मच होय. त्याला शरण जा. पापाच्या उदयाने हातात पडलेलेल द्रव्यक्षणात नाहीसे होते व पुण्योदयाने अति दूरची वस्तू प्राप्त होते. लाभांतराय कर्माचाक्षयोपयशम असला म्हणजे काहीही प्रयत्न न करता द्रव्याचे निधी हाती लागतात. पण पापोदय असला व आपण सदाचाराने वागत असलो तरीही जवळचे द्रव्य नाहीसे होऊन अनेक दोषांचे खापर माथी येते व जगात दुष्कीर्ती होते. यशनाम कर्माचा उदय प्राप्त झाला म्हणजे तेच अपवाद व दुष्कीर्तीही नाहीशी होते व दोष असेलले सर्व गुणासारखे दिसू लागतात.

संसार हा पापपुण्याच्या उदयाने भरलेला आहे. स्वार्थ व परमार्थ अशा दोन्ही प्रकारेच उदय परकृत आहेत, अतएव आत्मभिन्न आहेत असा जाणपणा मनात ठेवावा. कोणतीही अवस्था प्राप्त झाली तरी हर्षविषाद मानू नये. पूर्ण केलेला बंध आता उदयास येऊन आपले फल देऊन नाहीसा झाला हे एकार्थी बरेच झाले. त्या बंधाला आपल्या इच्छेप्रमाणे उदयास आणता आले नसेत. पुन: कर्म उदयाला आल्यानंतर त्यावर काही इलाज चालत नाही. कर्माचे फल जन्म, जरा, मरण, रोग, चिंता, भय, वेदान, दु-ख वगैरे प्राप्त झाले असता त्यापासून रक्षण करण्यास मंत्र, तंत्र, यक्ष, राक्षस, देव, औषध व प्रत्यक्ष परमेश्वर देखील समर्थ नाहीत. तसेच आकाशपाताळात कोठेही लपून बसलो तरी तो गाठल्यावाचून सोडणार नाही. औषधी वगैरे पदार्थ बाह्यनिमित्ताने देखील अशुभकर्माचा उदय मंद असेल तरच उपयोगी पडतात. दुष्ट, चोर, भिल्ल, वैरी, सिंह, वाघ, साप वगैरे गावात अथवा अरण्यात जेथे आपण सापडू तेथे मारून टाकतील. जलचर जीव पाणअयात गेलो तर मारतील. यापर्रमाणे अशुभकर्माचा उदय जर्मी, स्थली, काष्टी, पाषाणी, घरी, किंवा वनात, कुटुंबात किंवा शस्त्रास्त्रांनी सज्ज अशा राज्यसभेत कोठेही व केव्हाही सोडीत नाही. या जगात अशी काही ठिकाणे आहेत की, जेथे सूर्यचंद्राचा प्रकाश, हवा व विक्रियाऋध्दिधआरक देवाना देखी जाता येत नाही. पण कर्म

तेथेही जातेच यावरू न कर्माचा उदय असताना विद्या, मंत्र, बल, औषध, पराक्रम, मित्र योध्या, हत्ती, घोडा, रथ, सैन्य किल्ला, शास्त्रस्त्रादिक व साम, दाम दंड, भेदादिक उपाय यापैकी कोणीही आपण शरण गेलो असता रक्षण करण्यास समर्थ होणार नाहीत. उदयाला येणाऱ्या सूर्वाय प्रतिबंध करण्यासाठी कोणी समर्तनाही असे जाणून नेहमी साम्यभावाचे शरण ग्रहण करावे म्हणजे अशुभ कर्माची निर्जरा होईल व पुढे नवीन बंध होणार नाही. रोग, वियोग, दारिद्र, मरण, वगैरेचे भय सोडून धैर्य धारण करावे.

वितरागभाव, संतोषभाव व परमसाम्यभाव हाच सर्व दु:खाचा नाश करणारा आहे, दुसरा कोणीही नाही. आपणास शरण जाण्याला योग्य म्हणजे आपल्याच आत्म्यात वास्तव्य करणारे उत्तमक्षमादिक भाव आहेत. क्रोधादिक परभाव हेच इहलोकी जीवाचा घात करणारे आहेत. कषायांची मंदता होण्यापासूनच इहलोकी हाजोरो विघ्नापासून जीवाची सुटका होते. म्हणून अशा साम्यभावाला शरण जाणे हेच योग्य आहे. रागद्वेषाच्या मंदतेपासून नरकतिर्यचादि गतीत जाण्याचे कारण घडून येत नाही. मंदकषायी लोक देवलोकी किंवा उत्तम मनुष्य-योनीत जन्म घेतात.

पूर्वकर्माचा उदय प्राप्त झाला असता त्यापासून होणार्या सुखदु:खात जर आर्तरौद्र परिणाम केले तर, अस्तित्वात असलेल्या कर्माची उदीरणा होईल, म्हणजे कालांतराने उदयाला येणारी कर्मे आधीच उदयाला येऊन त्यापासून सुखदु:ख भोगावे लागेल. उदयास आलेल्या कर्माला कोणीच प्रतिबंध करू शकत नाही. यामुळे केवळ दुर्गतीला कारण अशा नवीन कर्माचा उदय येण्यास बाह्य साहाय्य करणआरी कारणे क्षेत्र, काल व भाव ही मिळून आल म्हणजे त्या उदयाला कोणीही प्रतिबंध करू शकणार नाही. जगात रोगावर औषध वगैरे उपचार केले जातात व प्रसंगविशेषी त्यापासून पुष्कळदा रोग नाहीसेही होतात. परंतु कर्माचा उदय बलवान असतो तेव्हा औषधही आपला गुण करीत नाही. उलट ते उपाय विपरीत फल देण्यास कारणीभूत होतात. सारांश - जीवाला ज्यावेळी असाता वेदनीय कर्माचा उदय प्रबल असतो त्यावेळी औषधादिक उपचारांचा उलट परिणाम घडून येतो व ज्यावेळी असाता वेदनीय कर्माचा उदय मंद असतो अथवा त्या कर्माचा उपशम असतो त्यावेळी औषध वगैरेपासून उपयोग होतो, काण कमी शक्ती असणाऱ्यांचा प्रतिबंध एखाद्या दुर्बल मनुष्यही करू शकतो, तोच मनुष्य बलवानाला प्रतिबंध करणअयास समर्थ नसतो. पंचमकालात शुभ कर्म उदयाला येण्यास बाह्य सामग्री फार थोडाआहे. ज्ञान थोडे आहे व पुरुषार्थही तसा उणाच आहे. याउलट, अशुभ कर्माला उदयाला येण्यास लागणाऱ्या बाह्य सामुग्रीचा पुरवठा विपुल आहे. म्हणून अल्प सामग्री, अल्पज्ञान व अल्पपुरुषार्थ याही करू न बलिष्ट अशा असाताकर्माचा उदय कसा जिंकला जाईल( एखाद्या मोठ्या नदीचा प्रवाह फुटून वेड्यावाकड्या मार्गाने वाहू लागतो व त्‍ात एखाद्‌ उत्तम पोहता येणार पुरुष सापडला तर त्याला त्या प्रवाहाच्या उलट पोहता येईल का( ज्यावेळी नदीचा प्रवाह मंद गतीने वाहात असेल त्यावेळी पोहण्याच्या कलेत निष्णात असणआरा मनुष्य त्यातून पोहून पैलतीरी जाऊ शकेल. त्याला एकाकी व जोराने येणार्या प्रवाहातून पार होता येणार नाही. याचप्रमाणए प्रबल कर्माचा उदय प्राप्त झाला असता त्यातून आपणाला कोणी सोडविणार नाही, असे सदैवे मनात बाळगावे. इहलोकी पृथ्वी व समुद्र हे दोन पदार्थ सर्वात मोठे आहेत. यातून पृथ्वीला प्रदक्षिणा घालणारे व समुद्रातून पोहून जाणारे पुष्कळ दिसून येतील. परंतु क्रमाच्या उदयातून तरू न जाणारा मात्र कोणी दिसत नाही. संसारात मनुष्यप्राण्यांना सम्यग्दर्शन, सम्यग्ज्ञान सम्यक्‌चारित्र व सम्क्‌तप या चार आराधनांशिवाय अनंतानंतकालात दुसरे कोणी रक्षण करण्यास समर्थ नाही.

उत्तम क्षमामार्दवादिक दशधर्मापासून अनेक दु:खे, अपमान वगैरे नाहीसे होणारे आहेत. मंद कषायापासून स्वाधीन सुख, आत्मरक्षण, निर्मल कीर्ती, उच्चपणा वगैरे अनेक सुखसामुग्री प्राप्त होते. हे त्याचे प्रत्यक्ष फल आहे असे जाणून त्ाला शरण जा. परलोकी मंद कषायाचे फल स्वर्गलोक- प्राप्ती होणारे आहे. व्यवहारात प्रत्येक जावीला चार पदार्थ शरण जाण्यायोग्य आहेत. अरिहंत देव, सिध्दपरमात्मा, निष्परिग्रह साधू आणि केवलिभगवंतांनी प्रकाशिलेला दयामयी धर्म यांना शरण गेल्याशिवाय आत्म्यात निर्मलपणा प्राप्त होणार नाही.

## ३ संसारानुप्रेक्षा

अनादिकालापासून संसारात मिथ्यात्व कर्माच्या उदयाने निश्चेष्ट झालेला जीव सर्वज्ञ तीवराग-प्रमीत धर्माला ग्रहणकरीत नाही. त्यामुळे त्यास चारही गतीत भ्रमण करावे लागत आहे. संसारात कर्मरूप दृढ बंधनाने बध्द झाल्यामुळे पराधीन होत्साता त्रसस्थावर योगनीत निरंतर भयंकर दु:ख भोगीत असून वारंवार जन्म-मरण करीतआहे. जे जे कर्माचे उदय येऊन रस देतात, त्या सर्व उदयांना आपले स्वरूप जाणून अज्ञानी जीव स्वरूपाचा त्याग करण्याने नवीन कर्माचा प्रत्यक्ष बंध करून घेत आहेत. कर्माच्या स्वाधीन झाल्यामुळे जीवाला दु:ख देणार्या ज्या जातीआहेत त्यातून एकही भोगावयाची राहिली नाही. संपूर्ण दु:खे भोगता भोगता अनंतानंत काल लोटला व याप्रमाणे अनंत परिवर्तने होऊ गेली. संसारात कोणतेही शरीर असे राहिले नाही की जे असून याला प्राप्त व्हावयाचे राहिले असेल. अनंत जातीची अनंत शरीरे धारण केली व आहार-भोजनपान केले, तीनशे त्रेचाळीस घनराजुप्रमाण या लोकात क्षेत्राचा कोणताही असा प्रदेश राहिला नाही की ज्या प्रदेशातया जीवो अनंतानंत वेळा जन्म-मरण केले नाही. याचप्रमाणे उत्सर्पिणी-अवसर्पिणी कालाचा असा एक समयही बाकी राहिला नाही की ज्या समयात या जीवाने अनंत वेळा जन्म-मरण केले नाही. मनुष्य, पशू, देव आणि नरक या चारही गतीत देखील जघन्य आयुर्मर्यादेपासून ते उत्कृष्ट मर्यादेपर्यंत संपूर्ण आयुष्याचे प्रमाण धारण करून अनंतवेळा जन्म-मरण केलेआहे. फक्त हा जीव अनुदिश अनुत्तर विमानात उत्पन्न झाला नाही. कारण त्या चौदा विमानात सम्यग्दष्टी जीवाशिवाय इतरांचा जन्म होत नाही. सम्यग्दष्टी पुरुषाला संसारपरिभ्रमण होत नाही असा नियम आहे.

कर्माची स्थिीती ज्या परिणामुळे बांधली जाते अशी स्थाने आहेत. त्यातून स्थितीबंधाला कारण असंख्यात लोकप्रमाण कषायाध्यवसायस्थाने व त्यांना कारण असंख्यात लोकप्रमाण अनुभागबंधाध्यवसायस्थाने आणि जगत्श्रेणीच्या संख्याताव्या भागाइतकी योगस्थाने यातून कोणताही भाव संसारी जीवाला प्राप्त झाले नहीत. त्याशिवया इतर सर्व भाव अनंतानंत वेळा प्राप्त झाले आहेत. जिनवचनावर भरवसा न ठेवणाऱ्या पुरुषाला मिथ्याज्ञानाच्या प्रभावाने अनादिकालापासून विपरीतबुध्दी होऊन राहिली आहे. यामुळे त्याला योग्य मार्गाचे अवलंबन करावे असे वाटत नाही. संसार हेच कोणी एक अरण्य, यात त्याचा नाश होऊन त्ाची निगोदात उत्पत्ती होते. निगोदात गेल्यावर अनंतानंत काल सुटका होण्याची आशा नको.

संसारी जीव पापोदयाने पृथ्वी-काय, जल-काय, अग्नि-काय, पवन-काय, प्रत्येक व साधारण वनस्पति-कायामध्ये उत्पन्न होतो. तेथे त्याचे ज्ञान नाहीसे झाल्याने तो जडासारखा होतो. त्याला फक्त स्पर्शनेंद्रियच असते.

याप्रमाणे तथे कर्माच्या उदयाधीन झालेला आत्मशक्ति रहित जीव, जीभ, नाक, कान, डोळे वगैरे इंद्रिये नसल्याने दीर्घकालपर्यंत दु:खात घालवीत असतो. कधी द्वीद्रिंय, त्रीद्रिय, चतुरिंद्रिय असा विकलत्रय जीव बनून आत्मज्ञान रहित होत्साता केवळ रसनेंद्रियाने विषयपूर्ती करू न घेण्याच्या तीव्र इच्छेने अनेक विषयप्राप्त्यर्थ वर उसळला जातो व तेथून पुन:खाली पडतो, मरू न जातो. विकलत्रयात असंख्यात काल भ्रमण करू न पुन:एकेंद्रियात येतो. रहाट-गाडग्याप्रमाणे प्रत्येक वेळी नवे शरीर धारण करीत चारही गतीत निरंतर जन्म-मरण, क्षुधा, तृषा, रोगवियोग वगैरे दु:खाचा अनुभव घेत, अनंतकाल फिरणे यालाच संसार असे म्हणावयाचे. ज्यापउमाणे तांदुळ आदणात टाकले असता ते खाली वर होत होत शिजत असतात, तद्वत संसारी जीव कर्माने संतप्त होऊन इकडे तिकडे परिभ्रमण करतात. आकाशात उडणाऱ्या पक्ष्यांना इतर पक्षी खातात. पाण्यात राहणाऱ्या लहान माशआंना इतर थोर मासे खातात. पृथ्वीवर असणाऱ्या मनुष्यपश्वादिकांना सिहं, वाघ, साप वगैरे दुष्ट पशू, चोर, भिल्ल, चांडाल, लुटारू वमहान निर्दयी लोक मारतात. याप्रमाणे संसारातील सर्व ठिकाणे भयाने निरंतर भरलेली आहेत. त्याठिकाणी हा जीव निरंतर दु:खाचा अनुभव घेत आहे.

शिकारीच्या त्रासाने भयभीत झालेला ससा स्वसंरक्षणार्थ आ पसरू न बसलेल्या अजगराच्या तोंडात बिळ जाणू प्रवेश करतो. तद्वत अज्ञानी जीव, क्षुधा, तृषा, काम क्रोधादिक इंद्रियांच्या विषयतृष्णेच्या संतापाने तृप्त झालेला, विषय हेच कोणी अजगराचे मुख त्यात प्रवेश करतो. विषयकषायामध्ये प्रवृत्त होणे हेच संसाररू प अजगराचे मुख आहे. यात प्रवेश करण्याने आपल्या ज्ञानदर्शन सुखसत्तादिक भावप्राणांचा नाश होतो व निगोदात उत्पन्न व्हावे लागते. त्याठिकाणी ज्ञान नसल्याने मृतासारखी त्याची स्थिती होते. असा स्थितीत जन्म-मरण करीत अनंतानंतकाल निघून जातो. निगोदात जीव उत्पन्न झाला असता त्याला आत्मा असून नसल्यासारखाच आहे. तेथे आत्मज्ञानाचा अभाव असतो. जरी तेथे आत्म्याचे अस्तित्व जाणले गेले, तरी ते असून नसून सारखेच आहे. निगोदात ज्ञान हे अक्षराच्या अनंताव्या भागाइतके सूक्ष्म असते. याप्रमाणे निगोदातील स्थिती आहे.

त्रसपर्यायातही अनेक दु:खाचे प्रकार आहेत. तेही सर्व या जीवाने अनुभविलेले आहेत. दु:खाचा कोणताही प्रकार याला प्राप्त झाला नाहीअसे नाही. ंससारात परिभ्रमण करीत जेव्हा याला दु:खाचे अनंतापर्याय प्राप्त होतात, तेव्हा कोठे तरी एखादा पंचेद्रियजनित पर्याय प्राप्त होतो. त्यात त्याला यत्किंचित सुखाचा भास होतो.

यापुढे चतुर्गतीचे स्वरू प परमागमानुसार येथे थोडे सांगितले असता त्याचा विचार करणअयास ठीक पडेल म्हणून ते सारांश रू पाने सांगतात. यातून पाहिल्यांदा नरकगतीचे स्वरू प असे आहे.

## चतुर्गतीचे स्वरू प

नरकाच्या सात पृथ्वी असून त्यात एकोणपन्नास (पटल) विभाग आहेत. त्या पटलात चौऱ्याऐंशी लाख बिळे आहेत. या सर्वांना मिळून नरक अशी संज्ञा आहे. नरकाच्या भिंती, छत व भूमी या वज्रमयी आहेत. कित्येक बिळे संख्यात योजने लांब, रुंद व कित्येक असंख्यात योजन लांब-रुंद आहेत. प्रत्येक बिळाच्या मध्याहून तोड्या वरच्या बाजूला नारकी जीवांची उत्पन्न होण्याची जागा आहे. ती उत्पत्तिस्थाने लहान तोंडाच्या उंटाच्या मुखाच्या आकाराची व उलट्या तोंडीची आहेत. त्यात नारकी जीव खाली डोके, वर पाय अशा रीतीने उत्पन्न होऊन खालच्या वज्रमयी कठिण

जमिनीवर इतक्या जोराने आदळतात की पुनः त्या जोरासरशी व उडून खाली पडतात. याप्राणे तेथील जमिनीवर कित्येक वेळ आपडून इकडून तिकडे लोळत पडतात.

असंख्यात विंचू डसले असता जितकी वेदना होते त्याहून असंख्यातपटीने अधिक वेदना नरकातल्या बूमीत होते. नरकातील बिळामध्ये पहिल्या चार पृथ्वीतील चाळीस लाख व पाचव्या पृथ्वीतील दोन लाख मिळून बेचाळीस लाख बिळात निव्वळ उष्ण वेदना असते. त्या उष्णतेचे वर्णन करून त्याचे सादृश्य इहलोकी दाखविण्यासारखा कोणताच पदार्थ दिसून येत नाही. तरी पण भगवंताच्या आगमात त्या उष्णतेचे वर्णन असे केले आहे की, एक लक्ष योजन प्रमाणाचा लोखंडाचा मोठा गोळा जर येथून नरकात सोडला तर तो जमिनीवर पोहोचण्याच्या अगोदर नरकातील उष्णतेने विरघळून जाईल. पाचव्या पृथ्वीच्या तीन चतुर्थांश बिळात व सहाव्या-सातव्या पृथ्वीतील बिळात इतकी जबरदस्त थंडी आहे की त्याच लक्ष योजन प्रमाणाच्या गोळ्याचा रस तेथे ठेवला तर एकाक्षणात त्याच्या थंडीने गोळा (बर्फ) बनून जाईल. याप्रमाणे शीत उष्ण वेदनेने भरलेल्या नरकामध्ये कर्मवश झाल्यामुळे या जीवाला असंख्यात कालपर्यंत भयंक दुःख भोगावे लागते. तेथे आयुष्य पूर्ण झाल्याशिवाय मरण प्राप्त होत नाही.

तेथे भुकेची वेदना इतकी भयंकर आहे की, जगातील दगड, माती वगैरे सर्व पदार्थ भक्षण केले तरी वेदना शमत नाही. पण एकदे भक्षण करावयाला तरी तेथे कोठून मिळणार( एक कण खाऊ म्हटले तर मिळत नाही. तहान किती( सर्व समुद्राचे पाणी प्राशन केले तरी मिटणार नाही इतकी, पण एक थेंब मिळेल तर शपथ. एकाच वेळी सर्व रोग शरीरात उत्पन्न व्हावयाचे. वेदनेचा काय पार आहे( याशिवाय नवीन जीव कोणी नरकात उत्पन्न झाला की तेथून पूर्वीचे जीव भयंकर रूप धारण करून, अनेक शस्त्रास्त्रांनी सज्ज होऊन त्या जीवाच्या अंगावर जातात व त्याला धरा, मारा, फाडून तुकडे करा, असे बीषण शब्द उच्चारीत मारण्याकरिता धावून येतात. ते नारकी जीव नागवे, काळेकुट्ट, रक्तपित्तीने व्यापलेले, डोळे वटारलेले, तोंड पसरलेले, ज्यांच्या मुखातील जीभ ही नागिणीसारखी चंचल आहे असे करवतीसारखे तीक्ष्ण दात असलेले उंच, काळ्या, पिवळ्या व तांबड्या केसांनी विक्राळ स्वरूपाचे असे, खूर नखांचे, महानिर्दयी, हुंडकसंस्थान धार करणारे असतात. ते येताच आपल्या हातातील मुद्गाराच्या प्रहाराने नव्या नारकी जीवाचे डोके फोडतात. नारकी जीवांचे शरीर हे भरलेल्या सरोवरातील पाण्याला मुसळाने मारले असता ते उसळून जसे परत त्यातच पडते तद्वत अनेक तुकडे करीत असूनही पुनः पहिल्यासारखेच बनून राहते. त्याच्या शरीराचे तरवारीने तुकडे करतात, त्याला करवतीने कापतात, कुऱ्हाडीन तोडतात, सुरीने छिलतात, भाल्याने टोचतात, सुळावर चढवितात, पोट व छातीतील मर्स्थाने विदारण करतात, डोळे काढतात, भट्टीत भाजतात, तेलाच्या कढईत शिजवितात व तेलाच्या घाण्यात घालून पिळतात. याप्रो परस्पर मारण, ताडन, विदार करीत असता नारकी जीवाना जे दुःख होत असते त्याचे कोटी जिह्वांनी कोट्यावधि वर्षेपर्यंत वर्न करू असे कोणी म्हटले तर त्याला एकक्षणाचे दुःख देखील देतान्या अवधीत वर्णन करवणार नाही. मग संपूर्ण दुःख-वर्णनाची गोष्ट तर दूरच राहिली.

नरकातील सामग्री व तेथील जीवांचे विक्राळ स्वरूप जर येथे कोणी दाखविले तर पाहणारा मनुष्य तत्काल भयाने मरून जाईल. नरकातील रसादि पदार्थ इतके कडू आहेत की, त्यापुढे येथील कांजीर, विष अथवा हलाहलही काहीच नाहीत. त्याच्या शरीराचा एक क जर येथे आला तर त्याच्या कडू वासाने येथील हजारो पंचेंद्रिय जीव प्राणत्याग करतील. नरकातील ाती इतकी दुर्गंधी आहे की सातव्या पृथ्वीतील मातीचा एक कण येथे आणला तर आजूबाजूला साडेचोवीस कोसापर्यन्तचे आठही दिशांचे पंचेंद्रिय जीव देहत्याग करतील. नरकाच्या एकेका पटलातील मातीच्या

दुर्गंधीमध्ये अर्ध्या कोसाहून अधिक लांब असलेले जीव मारण्याची एकेका पटलातील मातीच्या दुर्गंधीमध्ये अर्ध्या कोसाहून अधिक लांब असलेले जीव मारण्याची शक्ती आहे. या प्रमाणावरून सातव्या पृथ्वीच्या एकोनपन्नासाव्या पटलातील मातीच्या दुर्गंधीत साडेचोवीस कोसपर्यंतचे जीव मारण्याची शक्ती आहे. नरकात वैतरणी नदी आहे. तिच्या पाण्याचा स्पर्श झाल्याबरोबर नारकी जीवाचे शरीर फाटून जाते. त्या पा्याममध्ये क्षार, विष अग्नीसारखे कडक तापलेले तल वगैरे पदार्थ सिंचन केले असता जी वेदना होते त्याहूनही अपरिमित पीडा देम्याचे सामर्थ्य आहे. तेथील वारा इतका भयंकर आहे की, येथील पर्वताला त्याचा स्पर्श होताच ते निमिषार्धात उडून जातील. नरकात जो अग्नी आहे त्याला वज्राग्नी म्हणतात. जो जर आपणाला तर येथील पर्वत, समुद्र अथवा पृथ्वी यापैकी कोणीही क्षणभर त्याला धार करण्यास समर्थ होणार नाही. सांरांश - तेथील प्रत्येक पदार्थ अद्वितीय भयंकर आहे.

नारकी जीवांचे शब्द असे भयंकर कठोर आहेत की, ते जर ऐकू येतील तर येथील मदोन्मत्त हत्तीचे व सिंहाचे हृदय विदारण होईल. नरकातून जीवाला कर्मरूपी रखवालदार हजारो वर्षेपर्यन्त निघू देत नाहीत. तेथे नेही मारामारी होत असते. कित्येक रडतात, कित्येक कोमी धरावयाला येईल म्हणून पळत असतात. कित्येक दुसऱ्याच्या कह्यात सापडल्यामुळे आक्रोश करीत असतात. कित्येक येथील जीवाला धरून त्याचा चुरा करीत असूनही तेथील जीवांचे शरीर पाऱ्याप्रमाणे पुन: एकात एक मिळून जात असते. तेथे त्या दु:खातून बचावणारा कोणाही रक्षक नाही. कोणाला दया नाही. कोणी राजा नाही, कोणी मित्र नाही, आई, बाप, स्त्री, पुत्रकुटुंबादिक कोणी नाही. फक्त आपण केलेल्या कर्माचा उदय विद्याममान आहे. तेथे एखादी लपून राहण्याची जागा नाही. आपले दु:ख क्षणभर दुसऱ्याला जाऊन सांगावे म्हटले तरी तसा दयाळू कोणी नाही की, जो आपले दु:ख नाहीसे करील. त्याठिकाणी सर्व क्रूर, निर्दयी, महाभयंकर पातकी जीवच भरलेले आहेत. येथे जसे एका कुत्र्याचे दुसऱ्या कुत्र्याशी दृष्टिवैर असते, तद्वत नारकी जीवातही विनाकार परस्पर वैर असते. नारकी जीव जेव्हा दु:खातिशायाने व्याकुळ होऊन वनात विश्रांतीसाठी क्षणभर जातो तेव्हा जेथे जरी त्यास शांति मिळते काय( नाही. तेथे शाल्मली नांवाचे वृक्ष आहेत. त्यांची पाने शरीरावर आपोआप तुटून पडतात. त्यायोगे कुऱ्हाडीच्या घावासारखी वेदना होते. ती पाने अतिशय खूर असल्यामुळे त्याचे सर्व अंग विदारक होऊन जाते. तसेच त्या वनात असलेल्या गुहेतून सिंह, वाघ वगैरे पशू येऊन त्याचे अंग फाडून टाकतात. वज्रासारखी कठिण चोच धारण करणारे गिधाडपक्षी तेथे असतात. ते येऊन त्याच्या शरीराला टोचे मारतात, पोट फाडून आतून आतडी बाहेर काढतात, डोळ्यांना चोचीने टोचून इजा करतात. नरकात तिर्यंच नाहीत. नारकी जीव विक्रियेने तिर्यंचासारखे आपले रूप बनवितात. त्यांना वैक्रियिकऋद्धीने दुसरे नवे शरीर बनविता येत नाही. त्यांचे मूळ शरीर सिंह, वाघ, कुत्रा, घुबड, कावळे वगैरे पशुपक्ष्यांचे देह धारणण करते. नारकी जीवांना शुभक्रिया कराव्या अशी इच्छा झाली तर त्यांना तसे करता येत नाही. नेहमी आपणाला व दुसऱ्याला दु:ख होईल असेच विचार, क्रिया, विक्रिया वगैरे त्याजकडन घडावयाची. इतर शुभ क्रिया, विक्रिया वगैरे घडावयाच्या नाहीत. पापामुळे त्या क्षेत्रात उत्पन्न होण्याचा हा परिणाम आहे. नरकात जीवांना दु:ख देणारी अनेक प्रकारची शस्त्रास्त्रे म्हणजे सूळ, घाणे, लोखंडी कढया, तेल कढविण्याची पात्रे वगैरे क्षेत्र-स्वभावामुळे आपोआप उत्पन्न होत असतात. तेथे सुखदायी साग्री आढळायची नाही. नरकात लोखंडाची पुतळी, विस्तवात तापवन तांबडी लाल केलेली, जिचा स्पर्श होताच तीव्र वेदना हो लागतील अशी अपोआप उडून येन नारकी जीवांच्या अंगाला झोंबते. त्यावेळी कोट्यावधी विंचवाच्या दंशाइतकी, वज्राग्नीच्या स्पर्शाइतकी, विष माखलेल्या तीव्र तरवारीच्या घावाइतकीच काय पण या सर्वापेक्षा असंख्यात पटीने अधिक तीव्र वेदना होत असते. नरकातील दु:खदायक सामुग्रीचा स्वभाव दाखवन थोडे देखील त्याची प्रतीति दाखविण्यासारखी इहलोकी

कोणतीही वस्तू नाही. तरी तीव्रता जाणली जावी म्हणन वर कित्येक वस्तूंची उदाहरणे दिली आहेत. नारकी जीवांना किती व कसे दु:ख होत असेल हे प्रत्यक्ष केवली भवगंवतच जाणतात, अथवा जे नारकी होन त्याचा अनुभव घेत असतील ते जाणतात.

नारकी जीवांचे हाड, मांस, पू, रक्त, चर्म वगैरे सत्पधातूंनी बनविलेले नसले तरी उंट, कुत्रे, मांजर वगैरे प्राणांच्या सडलेल्या मांसाहून असंख्यात पटीने अधिक त्यांचे शरीर दुर्गंधी आहे. या पशूंच्या शरीराहून असंख्यात पटीने पाहण्याजोगी स्थिती आहे. त्यांचे स्वरूप पाहणे तर दूर राहो, पण नुसते वर्णन जर कोणी करू लागले तर ऐकवणार नाही इतके ते कुरूप आहे. नारकी जीवांच्या शरीराचा वास अतिशय वाईट येतो. तेथील माणसे जर त्यांना पाहतील तर त्यांच्या शरीराची दुर्गंधी यांच्या नाकाला पोहोचण्याच्या आतच प्राण सोडावा लागेल.

पूर्व जन्मात अनेक वाईट विचार मनात आणल्याने नरकायचा बंध होन असंख्यात कालपर्यंत दु:खे भोगीत तेथे राहावे लागते. पुष्कळ प्रकारचे पाप प्रत्यक्ष ज्यात घडून येत आहे, अशी कामे करणारे, धन्यधान्यादि परिग्रह-सामग्रीमध्ये अतिशय आसक्त झालेले, भयंकर हिंसेचा विचार मनात बाळगणारे, विश्वासघाती, धर्मद्रोही, गुरुद्रोही, स्वामिद्रोही, कृतघ्नी, परधन व परस्त्रीलोलुपी, अन्यामार्गी, धर्मात्मा व गृहत्यागी पुरुषावर खोटे आरोप करणारे, यतींचा घात करणारे, कृष्णलेश्या (सर्वांचे सदैव अकल्याण व्हावे असा विचार) धारण करणारे, निर्मळ सुग्रास अन्नाचे भोजन मिळत असूनही जिह्वेन्द्रियाच्या लोलुपतेने मांसभक्षण करणारे, मद्यपान करणारे, वेश्यासक्त, परविघ्नसंतोषी, लंपटी, तीव्र लोभी, दुराचारी, मिथ्यात्व, अन्याय, अभक्ष्य यांची प्रशंसा करणारे, हे सर्व नरकाला जातात. अन्नात विष कालविणारे, विष वगैरे प्राणघातक वस्त तयार करणारे, अरण्य तोडणारे, वनात अग्नी लावणारे, जीवांना एखाद्या वाड्यात कोंडन जाळून टाकणारे, हिंसेची परंपरा चालू ठेवणारे हेही नरकात जातात. अंबा अंबरीषादिक दुष्ट असुरकुमार-जातीचे देव तिसऱ्या पृथ्वीपर्यंत जाऊन नारकी जीवांना पूर्वजन्मवैराची आठवण देऊन परस्पर तंटे करवितात. कित्येकांना तिसऱ्या पृथ्वीपर्यंतच पूर्वजन्मीच्या संबंधामुले स्वर्गवासी देव येऊन धर्मोपदेश देतात.

कित्येक नारकी जीवांना पूर्वीच्या पापाबद्दल वाईट वाटन ते मोठा पश्चात्ताप कर लागतात, तो असा- (मला पूर्वी सज्जनीं असे वाईट कर्म न करण्याबद्दल पुष्कळ उपदेश केला होता, परंतु त्या दुष्टाने विषय-कषायाने मदांध झाल्यामुळे तो ग्रहण केला नाही. आता मला या ठिकाणी दैव अुकल नाही व काही पुरुषार्थ करावा म्हटले तर करण्याची सोय नाही, आता काय करावे( ज्या दुष्टांनी मला पाप करण्याची बुद्धी दिली, मला अनीतीकडे वळविले ते मला नरकात लोटन आपण कोठे गेले कोणास ठाक( आपल्याबरोबर येण्यासारखे कोणी दिसत नाही. माझ्याजवळ द्रव्य होते त्यावेळ मात्र अनेक प्रकारच्या इंद्रियांच्या विषयांचा उपभोग घेण्यास, पापकर्म करण्याची मला प्रेरणा करण्यास व त्याला सहाय्य करण्यास पुत्र, मित्र, स्त्री, बांधव, आप्त वगैरे मंडळी होती. पण आता त्यांना मी कोठे शोध( याप्रमाणे पूर्वजन्मी जे अनेक दुराचार केले त्याची कुअवधिज्ञानाने आठवण करून पश्चात्ताप करीत असतात. त्यांना भयंकर मानसिक दु:ख सोसावे लागते. एखाद्या सुदैवी पुरुषासक्वचित सम्यग्दर्शनही तेथे उत्पन्न होते. पण नरकपर्यायात उत्पन्न झाल्यामुळे दु:ख मुळीच कमी होत नाही. जरी त्याची स्वत: कोणाला मारण्याची इच्छा नसली तरी त्याला कषायाचा बलवान उदय थांबविता येत नाही. त्याचे हात हेच शस्त्रासारखे बनून दु:ख देण्यास कारणीभूत होतात.

नारकी जीवांना एक क्षणभर विसावा घेऊ म्हटले तर सोय नाही व झोप नाही. तेथे जमिनीचा स्पर्श झाला असता जे दु:ख होत ते केवलिगम्य आहे. कर्माचा उदय अतिशय तीव्र असल्यामुळे तेथे कोणीही रक्षण करणारा नाही. कोणाला तरी शरण जावे म्हणून दीन होत्साता पुष्कळ विचार करतो, परंतु तेथे कोणी दयाळू प्राणीच नाही त्यास त्याचा काय इलाज( तेथील सर्व जीव क्रूर निर्दयी, भयंकर देह